॥ श्री ॥

# वनौषधि गुणादर्श.

भाग ६ वा.

संपादक,

आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.

प्रकाशक

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित.

बुकसेलर, पुणें पेठ बुधवार.

सन १९१९.

किंमत १२ आणे.

5075
२११७
0339
5075
२११७
0339

लो. टिळक ग्रंथसंग्रहालय वाई

कृपया खाली दिलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी ग्रंथ परत करावा.
वेळेत न आलेल्या ग्रंथास विलंब शुल्क द्यावे लागेल.

This book belongs to

Nagesh Shripat Kapre

B. A.

६९८३

६९८३

श्रीः

# वनौषधि-गुणादर्श.

## भाग ६ वा.

S7015
२८८०/03339

संपादक,

कै० आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे.

औषधीनां परां प्राप्तिं कश्चिद्वेदितुमर्हति ।
योगज्ञस्तस्य रूपज्ञस्तासां तत्त्वविदुच्यते ॥ --चरके.

प्रकाशक

यज्ञेश्वर गोपाळ दीक्षित, बुधवार पेठ, पुणें.

मुद्रक

अच्युत चिंतामण भट, यशवंत छापखाना,
१४८३ कसबा पेठ, पुणें.

आवृत्ति पांचवी.

सन १९१९

किंमत १२ आणे.

६-१

5075

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पदे यांजकडून विकत घेऊन
प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत.

# वनौषधि-गुणादर्श, भाग ६ वा.

## रोग व त्यांजवर ज्या वनस्पतींचा उपयोग होतो त्या वनस्पतींचीं नांवें.

| रोगाचें नांव | वनस्पती | रोगाचें नांव | वनस्पती. |
|---|---|---|---|
| अग्निदग्ध व्रणावर ... ... | सांवर | आंवेवर ... ... | हिरडा |
| ,, ... ... | साळ | उचकीवर ... ... | हिंग |
| ,, ... ... | सबजा | ,, ... ... | हिरडा |
| अजीर्णावर ... ... | हिंग | उदरावर ... ... | ,, |
| ,, ... ... | हिरडा | उंदराच्या विषावर ... ... | हुरा |
| ,, ... ... | सुरबंध | ,, ... ... | हेद |
| अतिसारावर ... ... | सालवण | ,, ... ... | सर्पाक्षी |
| ,, ... ... | सांवर | उन्माद रोगावर ... ... | सालवण |
| अन्नद्रवशूळावर ... ... | हरीक | उन्हाळ्यांवर ... ... | साग |
| ,, ... ... | सांवा | ,, ... ... | सातवीण |
| अपस्मारावर ... ... | हिंग | उपदंशावर ... ... | सागरगोटा |
| अफूवर उतार ... ... | ,, | उसण ( हूक ) भरते त्यावर | समुद्रफळ |
| आम्लपित्तावर ... ... | हिरडा | ओकारीवर ... ... | हिरडा |
| अर्धशिशीवर ... ... | समुद्रफळ | ,, ... ... | साखरनिंबू |
| ,, ... ... | सालवण | अंग येतें त्यावर ... ... | सहदेवी |
| ,, ... ... | साळ | अंडवृद्धीवर ... ... | हिरडा |
| ,, ... ... | हिंग | अंतकसन्निपातावर ... ... | ,, |
| ,, ... ... | हेद | अंतर्विद्रधीवर ... ... | ,, |
| अर्धांगवायूवर ... ... | सालवण | अंत्रवृद्धीवर ... ... | ,, |
| अरुचीवर ... ... | ,, | कटिशूळावर ... ... | सालवण |
| अस्थिभंगावर ... ... | सांधरुख | कथल्या गर्मीवर ... ... | सराटे |
| ,, ... ... | हाडसंधि | कधीं कोणताही रोग न होण्यास | हिरडा |
| ,, ... ... | हाडमोडी | कफरोगावर ... ... | हळद |
| ,, ... ... | सुम्रिणी | कफपांडुवर ... ... | सालवण |
| अहिऱ्यावर ... ... | हळद | कर्णनादावर ... ... | हिंग |
| आगंतुक गर्मीवर ... ... | साग | कर्णमूलावर ... ... | हिंगणी |
| ,, ... ... | सबजा | कर्णशूलावर ... ... | सालवण |
| आग्याचे विषावर ... ... | सर्पाक्षी | कवलूवर ... ... | हेद |
| आनाहावर ... ... | हिरडा | कान फुटल्यास ... ... | सबजा |
| आमवातावर ... ... | ,, | ,, ... ... | सुरपीण |
| आमातिसारावर ... ... | ,, | कामीण रोगावर ... ... | समुद्रफळ |
| आंवेवर ... ... | सागरगोटा | ,, ... ... | सोमवल्ली |
| ,, ... ... | सुरण | ,, ... ... | हरभरा |

| रोगाचें नांव | वनस्पती. |
|---|---|
| कामीण रोगावर | हळद |
| ,, | हेद |
| कासश्वासावर | हिरडा |
| कुत्र्याचे विषावर | हिंगणी |
| कृमीवर | समुद्रफळ |
| ,, | सबजा |
| केस येण्यास | सुरू |
| कंठरोगावर | सालवण |
| खवड्यावर | सबजा |
| खुपऱ्यावर | हिंग |
| खोकल्यावर | समुद्रफळ |
| ,, | सालवण |
| ,, | हळद |
| ,, | हिंगणी |
| ,, | हेळू |
| खोकला येऊन रक्त पडतें त्यावर | हिरडा |
| गर्भपातावर | सालवण |
| गर्भिणीच्या धुपणीवर | सराटे |
| गर्मीचा आजार भिनल्यामुळें अंगावर गांधी उठतात त्यांस | सराटे |
| गर्मीच्या आजारावर | सांवर |
| गर्मीच्या चट्ट्यांवर | हिरडा |
| गर्मीच्या चट्ट्यांवर | सोनारवेल |
| गळवें वगैरे पिकून फुटण्यास | समुद्रशोक |
| गुरांच्या क्षतांतील कृमि मरण्यास | हेद |
| गुल्मरोगावर | सातवीण |
| ,, | हिरडा |
| गृध्रसीवर | ,, |
| गंडमाळेवर | सहदेवी |
| घाम बंद होण्यास | हरभरा |
| ,, ,, | हिरडा |
| घाम काढण्यास | सहदेवी |
| घोणसाचे विषावर | हुरा |
| चातुर्थिक ज्वरावर | हिंग |
| चिखल्या होतात त्यांवर | साळ |
| ज्वरावर | सताप |
| ,, | सागरगोटा |
| ,, | सातवीण |
| ,, | सालवण |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|
| ज्वरावर | साळ |
| ,, | सोमवल्ली |
| ,, | हळद |
| ,, | सोनवेल |
| जनावरांच्या क्षतांत किडे पडतात त्यावर | हिंग |
| जिभेस खरे येतात त्यास | सागरगोटा |
| जीर्णज्वरावर | सालवण |
| जीर्णातिसारावर | सांवर |
| जुलाब होण्यास | सूर्यफूल |
| जंतावर | सताप |
| ,, | सागरगोटा |
| झांपडीवर | सालवण |
| डब्यावर | सागरगोटा |
| ,, | हेद |
| डोळ्याचे पटलास | समुद्रफळ |
| डोळ्यांतील फुलास | ,, |
| डोळ्याचें अंग लाल होऊन तिडका लागल्यास | हळद |
| डोळ्याची आग शांत होण्यास | साळई |
| डोळे येतात त्यावर | हिरडा |
| ,, | साळई |
| तापावर | सहदेवी |
| तारुण्यपीटिकेवर | हिंगणी |
| त्रिदोषावर | हिरडा |
| ,, | त्रिफळाचूर्ण |
| तृषारोगावर | साळ |
| तेलानें भाजलेले व्रणावर | सालवण |
| तंतुप्रमेहावर | सराटे |
| थंड्या प्रमेहावर | सांवर |
| दम्यावर | हिरडा |
| ,, | हेळू |
| ,, | सुरपीण |
| ,, | दशमूलादि काढा |
| ,, | सालवण |
| दाढ दुखते त्यास | हिंग |
| दाह शमन होण्यास | साळई |
| ,, | सबजा |
| देवी कधींही न येण्यास | सांवर |
| देवी हलक्या येण्यास | सुभ्रिणी |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|
| दंतकृमीवर | हिंग |
| धनुर्वातावर | सालवण |
| धातुपुष्टतेवर | सांवर |
| ,, | हरभरा |
| ,, | हरणवेल |
| धातुविकारावर | सराटे |
| ,, | सालंमिश्री |
| ,, | हरणखुरी |
| धातुस्थानचे कडकीवर | सराटे |
| ,, | साग |
| धातुस्थानचे उष्णतेवर | साग |
| धातुक्षयावर | हरणखुरी |
| धुपणीवर | सोनचांफा |
| धोंड्याचे विषावर | समुद्रफळ |
| नळवायूवर | सातवीण |
| नळवायूवर | हेद |
| नळावर | हुरा |
| ,, | सुरपीण |
| नाडीव्रणावर | हिरडा |
| नारूवर | हाळद |
| ,, | हिंग |
| ,, | हाडमोडी |
| ,, | हिंगणी |
| ,, | हेद |
| नाळगुदावर | हेद |
| निद्रा येण्यास | सहदेवी |
| नेत्ररोगावर | हळद |
| ,, | हिरडा |
| ,, | हेद |
| नेत्रस्रावावर | हिंगणी |
| प्रदरावर | सराटे |
| ,, | सालंमिश्री |
| ,, | सांवर |
| ,, | सालई |
| प्रमेहावर | हिरडा |
| ,, | हरणखुरी |
| ,, | हाशा |
| प्रसूतीच्या मक्कलशूलावर | हिंग |
| पटकीवर | हरभरा |
| ,, | हिंग |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|
| पटकीवर | सापसंद |
| ,, | सोनारवेल |
| पडशावर | सालवण |
| ,, | हरभरा |
| ,, | हळद |
| परसाकडे खडा धरल्यास | हळद |
| परिणामशूलावर | हिंग |
| पांडुरोगावर | हिरडा |
| पानथरीवर | सांवर |
| ,, | हरभरा |
| ,, | हिरडा |
| पार्श्वशूलावर | सालवण |
| पित्तगुल्मावर | हिरडा |
| पित्तानें शरीर क्षीण झालें तर | ,, |
| पिष्ठमेहावर | हळद |
| पिस्वा नाहींशा होण्यास | सुरबंद |
| पीनस रोगावर | सबजा |
| पुष्टतेवर | सालंमिश्री |
| पृष्टिशूलावर | सालवण |
| पैणीस | सुप्रीणी |
| पोटशूलावर | समुद्रफळ |
| ,, | सागरगोटा |
| ,, | हरभरा |
| ,, | हिंग |
| ,, | हीवर |
| ,, | सबजा |
| ,, | सापसंद |
| ,, | सुरबंद |
| पोटाचे फुगवटीस | सालवण |
| पंचमूलीक्षीर | सालवण |
| फुरशाचा विषार उमळून रक्त वाहिलें तर | साग |
| फुरशाच्या विषावर | सर्पाक्षी |
| बचनागाचे विषावर | हिंग |
| बद पिकण्यास | सांवर |
| ,, | हेळू |
| बहिरेपणावर | हिंग |
| ,, | सबजा |
| बालकांस टाळू पडते त्यास | हिरडा |
| बाळंतरोगावर | सागरगोटा |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
| --- | --- |
| बाळंतरोगावर ... .. | सालवण |
| बैल किंवा रेडे रक्त मुततात त्यास ... ... | सबजा |
| भ्रमपित्तास ... ... | सराटे |
| भगंदरावर ... ... | हिरडा |
| भस्मकरोगावर ... ... | साळ |
| भांगेवर उतार ... ... | साळ |
| भूतज्वरावर ... ... | सूर्यफूल |
| मधुऱ्यावर ... ... | साळ |
| मलशुद्धि साफ होण्यास ... | सालंमिश्री |
| ,, ... ... | हिरडा |
| मस्तकवायूवर ... ... | हरभरा |
| मस्तकशूळावर ... ... | सालवण |
| ,, ... ... | हिरडा |
| मांड होतो त्यास ... ... | सुर्पीण |
| माशीचे दंशावर ... ... | हिरडा |
| मुखरोगावर ... ... | सहदेवी |
| मुंग्याचे दंशावर ... ... | हिरडा |
| मूतखड्यावर ... ... | सराटे |
| ,, ... ... | साग |
| ,, ... ... | हळद |
| मुलांच्या अयनेरावर ... | हिरडा |
| ,, आकडीवर ... | ,, |
| ,, कफविकारावर... | समुद्रफळ |
| ,, कृमींवर ... | सापसंद |
| ,, ... ... | सुरपीण |
| ,, खोकल्यावर ... | सताप |
| ,, ,, ... ... | सुरपीण |
| जंतविकार, पोटफुगी व पोटदुखी यांवर ... | सुरबंद |
| पडशावर ... ... | सुरपीण |
| पोटांतील डब्यावर ... ... | सूर्यफूल |
| पोटांत देवी व गोंवर यांची आग बसते त्यावर ... ... | सराटे |
| मुलांच्या पोटांत रक्ताची गांठ बनते त्यास ... ... | समुद्रफळ |
| ,, ,, ,, ... | सागरगोटा |
| ,, वगला उडतात त्यास | सताप |
| ,, माकडखोकल्यावर | हेळू |
| ,, सर्दीचा विकार न होण्यास | सताप |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
| --- | --- |
| मुलांच्या ससणीवर ... ... | सताप |
| ,, ,, ... ... | हळद |
| ,, ,, ... ... | सोनचांफा |
| ,, ,, ... ... | सोनवेल |
| ,, हगवणीवर... ... | सुरपीण |
| मूर्छेवर ... ... | हळद |
| ,, ... ... | हिरडा |
| मूढगर्भ ( आडवें येतें ) ... | सालवण |
| मूत्रकृच्छ्रावर ... ... | सराटे |
| ,, ... ... | सालवण |
| मूत्ररोगावर ... ... | ,, |
| ,, ... ... | हिंग |
| रेचनावर ... ... | साळ |
| मूत्राश्मरीवर ... ... | सालवण |
| मूत्रांतून धातु किंवा खर जात असल्यास ... ... | सांवर |
| मूत्राघातावर ... ... | साग |
| मूत्रव्याधीवर ... ... | सुरण |
| ,, ... ... | हळद |
| मेदोरोगावर ... ... | साग |
| ,, ... ... | सालवण |
| ,, ... ... | हिरडा |
| मोडशीवर ... ... | हिंगणी |
| ,, ... ... | हेळू |
| मोह यांवर ... ... | सालवण |
| यकृत् विकारावर ... ... | सोमवल्ली |
| ,, ... ... | हेद |
| योनिकंदावर ... ... | हरणवेल |
| रक्तबाऊस ... ... | साग |
| धांवऱ्यावर ... ... | हुरा |
| रक्तातिसारावर ... ... | सालई |
| रेचक ... ... | हुरा |
| लहान मुलांस सर्दी झाली तर | सताप |
| ,, कांटे यतात त्यावर | हळद |
| ,, रेचक ... ... | हिरडा |
| लहान वांसरांस थंडी व कृमीवर | सागरगोटा |
| व्रण भरून येण्यास ... ... | सातवीण |
| व्रणसंबंधीं कृमि दूर होण्यास | हिंग |
| व्रण पिकण्यास ... ... | हाशा |
| व्रण बसण्यास ... ... | हाशा |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|
| व्रणावर ... ... | हिरडा |
| वनमाशांचे दंशावर... ... | ,, |
| वल्मीकावर ... ... | साग |
| वळ पिकण्यास ... ... | हेळू |
| वातगलगंडावर ... ... | सालवण |
| वातविकारावर ... ... | समुद्रशोक |
| ,, ... ... | हाडसंधी |
| ,, ... ... | हिरडा |
| वातरक्तावर ... ... | ,, |
| वांतीवर ... ... | ,, |
| वातोदरावर ... ... | सालवण |
| वायगोळयावर ... ... | सागरगोटा |
| ,, ... ... | हिंग |
| विंचवाचे दंशावर ... ... | सांवर |
| ,, ... ... | सूर्यफूल |
| ,, ... ... | हंसपदी |
| ,, ... ... | हळद |
| ,, ... ... | हिंग |
| ,, ... ... | हुरा |
| ,, ... ... | सबजा |
| ,, ... ... | सर्पाक्षी |
| विबंधावर ... ... | हिरडा |
| विषमज्वरावर ... ... | सहदेवी |
| ,, ... ... | सर्पाक्षी |
| ,, ... ... | सोनचांफा |
| विषूचिकेवर ... ... | हिरडा |
| विसर्पावर ... ... | ,, |
| वीर्यस्तनावर ... ... | सांवर |
| वृषणाचे सुजेवर ... ... | हिरडा |
| शनैर्मेहावर ... ... | हिरडा |
| शरीर बळकट होण्यास ... | सांवर |
| श्वासावर ... ... | सालवण |
| ,, ... ... | हिरडा |
| श्लीपद ( पाय किंवा हात मोठे होणें ) या रोगावर ... | साग |
| ,, ,, ... ... | हळद |
| ,, ,, ... ... | हिरडा |
| शीघ्र प्रसूतीस ... ... | सूर्यफूल |
| शीतज्वरावर ... ... | हिरडा |
| शीतपित्तावर ... ... | साग |

| रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|
| शुक्ररोगावर ... ... | हिंग |
| शुक्राश्मरीवर ... ... | साग |
| शूळावर ... ... | सातवीण |
| ,, ... ... | सालवण |
| ,, ... ... | हिरडा |
| ,, ... ... | हिंगणी |
| शोषरोगावर ... ... | साळ |
| शौचास साफ होत नसेल तर ( बद्धकोष्ठ ) ... ... | हिरडा |
| स्तनरोगावर ... ... | हळद |
| ,, ... ... | हिंगणी |
| स्वरभेदावर ... ... | हळद |
| सन्निपातज्वरावर ... ... | समुद्रफळ |
| ,, ... ... | सालवण |
| सन्निपातयोनिशूलावर ... | ,, |
| सरदगर्मीवर ... ... | साळ |
| सर्दीनें कानाचे दडपे बसल्यास | हिंग |
| सर्पदंशावर ... ... | समुद्रफळ |
| ,, ... ... | साग |
| ,, ... ... | हुरा |
| सर्पदंशावर ... ... | सबजा |
| ,, ... ... | सर्पाक्षी |
| ,, ... ... | सापसंद |
| ,, ... ... | सोनवेल |
| सर्व रोगांचे विषावर ... | सापसंद |
| ससणीवर ... ... | हळद |
| सांद्रमेहावर ... ... | सातवीण |
| स्त्रियांचें अंग बाहेर आलें तर | सूर्यफूल |
| सिध्मकुष्ठावर ... ... | सहदेवी |
| सुजेवर ... ... | सागरगोटा |
| ,, ... ... | हिरडा |
| सुरामेहावर ... ... | सांवर |
| सूर्यावर्त रोगावर ... ... | सालवण |
| संग्रहणीवर ... ... | सालंमिश्री |
| ,, ... ... | सालवण |
| संधिगत सन्निपातावर ... | हिरडा |
| संधिवातावर ... ... | हाडमोडी |
| ,, ... ... | सालई |
| हरताळाचे विषावर ... ... | सर्पाक्षी |

| रोगाचें नांव. | वनस्पती. | रोगाचें नांव. | वनस्पती. |
|---|---|---|---|
| हिंगाष्टक चूर्ण ... ... | हिंग | हृद्रोगावर ... ... | सांवर |
| हृदयशूलावर ... ... | सालवण | क्षतांतील कृमि मरण्यास ... | सबजा |
| हृद्रोगावर ... ... | ,, | क्षयावर ... ... | सागरगोटा |

## या भागांत आलेल्या वनस्पतींची वर्णवारीनें

## अनुक्रमणिका.


| वनस्पतीचें नांव. | पृष्ठांक. | वनस्पतीचें नांव. | पृष्ठांक. |
|---|---|---|---|
| संत्रे निंबू ... ... ... | १ | सालई ... ... ... ... | २५ |
| सराटे ... .. ... ... | २ | सांवा ... ... ... ... | २६ |
| सताप ... ... ... ... | ३ | सुप्रिणी ... ... ... ... | २६ |
| सप्तालूं ... ... ... ... | ३ | सुरपीण ... ... ... ... | २७ |
| सफरचंद ... ... ... ... | ३ | सुरबंद ... ... ... .. | २७ |
| समुद्रफळ ... ... ... ... | ४ | सुरू ... ... ... ... | २८ |
| समुद्रशोक ... ... ... | ५ | सोनचांफा ... ... ... | २८ |
| साग ... ... ... ... | ५ | सोनवेल ... ... ... ... | २९ |
| सागरगोटा ... ... ... | ७ | सोनारवेल ... ... ... | २९ |
| सागू ... ... ... ... | ८ | हरभरा ... ... ... ... | ३० |
| सातवीण ... ... ... ... | ८ | हरीक ... ... ... ... | ३१ |
| सांधरुख ... ... ... ... | ९ | हंसपदी ... ... ... ... | ३२ |
| सालंमिश्री ... ... ... | ९ | हळद ... ... ... ... | ३२ |
| सालवण ... ... ... ... | ११ | हाडसंधी ... ... ... ... | ३४ |
| सांवर ... ... ... ... | १३ | हिंग ... ... ... ... | ३५ |
| साळ ( भात ) ... ... ... | १५ | हिरडा ... ... ... ... | ३७ |
| सुरंगी ... ... ... ... | १८ | हरणखुरी ... ... ... | ४३ |
| सुरण ... ... ... ... | १८ | हरणवेल ... ... ... ... | ४३ |
| सूर्यफूल ... ... ... ... | १९ | हाडमोडी ... ... ... | ४३ |
| सोमवल्ली ... ... ... ... | २१ | हाशा ... ... ... ... | ४४ |
| स्थलकमलिनी ... ... ... | २१ | हिंगणी ... ... ... ... | ४५ |
| सबजा ... ... ... ... | २२ | हिरवा चांफा ... ... ... | ४६ |
| सहदेवी ... ... ... ... | २३ | हिवर ... ... ... ... | ४६ |
| सर्पाक्षी ... ... ... ... | २३ | हुरा ... ... ... ... | ४६ |
| साखरनिंबू ... ... ... | २४ | हेद ... ... ... ... | ४७ |
| सापसंद ... ... ... ... | २४ | हेकू ... ... ... ... | ४८ |

श्रीशंकर.

# वनौषधी-गुणादर्श.

## भाग ६ वा.

### १ संत्रें निंबू.

हें झाड निंबोणीएवढें असतें. याचें फळ नारिंगाएवढेंच असून, त्याचा वर्ण लालट असतो. हें निंबू खाण्यास आंबटगोड असतें. याच्या योगानें तोंडास रुचि येते. हें फळ रक्त साफ करणारें व थंड आहे.

### २. सराटे.

( सं. वनशृंगाट. गु. उभो बेठो. )

सराट्याचे वेल असतात. या वेलाचीं पानें बारीक असतात. या पानांची भाजी होते. हे वेल काळ्या माळजमिनींत होतात. देशावर हे वेल पर्जन्यकाळीं पुष्कळ होतात. सराटे वाळले म्हणजे त्या रानांतून जाण्यास मनुष्यांस फारच त्रास पडतो. गोखरूंच्या ऐवजीं सराट्यांचा उपयोग करितात. याचे गुण गोखरूंप्रमाणेंच आहेत. ( १ ) **भ्रम-पित्तास**–सराटीचा व कंवठीचा पाला यांचा रस चार पैसेभार, गाईचे निरसे दुधांतून द्यावा. ( २ ) **गर्भिणीच्या धुपणीस**––सराट्यांचें चूर्ण ६ मासे घेऊन खडीसाखर व तूप यांत कालवून द्यावें. ( ३ ) **कथल्या गर्मीवर** ( अंगांत भिनलेल्या गर्मीवर )––सराटे साधारण कुटावे आणि त्यांत खडकाच्या दरींत उत्पन्न होणाऱ्या गुळवेलीचा कंद, एक तोळा सराट्यांत सहा मासे घालावा, आणि चाळीस तोळे पाणी घालून अष्टमांश उरवून हा काढा प्रातःकाळीं द्यावा; व तींच औषधें शिल्लक ठेवून त्यांत एक तोळा खडीसाखर घालून सायंकाळींही पूर्ववत् अष्टमांश काढा करून द्यावा. आणि चट्ट्यांवर कापूरभेंडीचें ( किंवा पारोसा

पिंपळ ) मूळ पाण्यांत उगाळून लेप देत जावा. याप्रमाणें ४२ दिवस व जरूर वाटल्यास जास्त दिवसही औषध घ्यावें. पथ्य करावें. ( ४ ) **गर्मीचा आजार अंगांत भिनल्यामुळें अंगावर गांधी उठतात त्यास** —सराटे तोळा १, कंकोळ पावतोळा व खडीसाखर १ तोळा यांचा अष्टमांश काढा करून तो सतत घेत जावा. ( ५ ) **तंतुप्रमेह, धातुस्थानची कडकी, धातुविकार, प्रदर व मुलांच्या पोटांत देवी व गोंवर यांची धग बसत असते त्यांवर**— सराटे तुपांत तळावे आणि त्यांची पूड करून ठेवावी. प्रत्यहीं प्रातःकाळीं व सायंकाळीं एक तोळा गाईचें तूप घेऊन त्यांत अर्ध तोळा सराट्यांची पूड व अर्ध तोळा पिठीसाखर किंवा खडीसाखर याप्रमाणें २१ दिवस घ्यावें. मुलांस वरील मिश्रणाची सुपारीएवढी गोळी नित्य प्रातःकाळीं एक वेळ द्यावी. ( ६ ) **मूत्रकृच्छ्रावर**—सराट्याचें झाड मुळासुद्धां उपटून आणून अष्टमांश काढा करून त्यांत खडीसाखर व मध घालून प्यावा. ( ७ ) **मूतखड्यावर**— सराट्याचें चूर्ण मधांत खलून मेंढीचे दुधांतून सात दिवस द्यावें.

### ३. सताप.

( सं. विषापहा. सर्वदंष्ट्रा. गु. सताब. हिं. सिताब. आ. हरमल. फा. इस्पंद. इं.ommon run कॉमनरू. लॅ. Ruta gravolans रूटा ग्राव्होलॅन्स् )

सतापाचीं झाडें लहान असून तीं हरबऱ्याच्या झाडासारखीं असतात. याचीं पानेंही हरबऱ्याच्या पानांप्रमाणें असून, किंचित् लांबट असतात. या पानांस दर्पट वास येतो. याची उंची सुमारें दोन हात असते. हीं झाडें पर्जन्यकाळीं उत्पन्न होतात. हीं बगीच्यांत लावलीं असतां होतात. याचें बीं खसखशीहून बारीक असून काळसर असतें. **सताप**— सारक, उष्ण व कडू असून कफ व वात यांचा नाश करतो. ( १ ) **जंतावर**—धण्याच्या पाण्यांत सतापाचा रस घालून द्यावा. ( २ ) **लहान मुलांस सर्दी झाल्यास**—केळीच्या पानांत सतापाच्या पाल्याची पुडी बांधून ती पुडी एका दोऱ्यांत बांधून मुलांचे गळ्यांत बांधावी. या दर्पानेंच लहान मुलांचा सर्दीचा विकार मोडतो. ( ३ ) **मुलांच्या बगला**

उडतात त्यास—सतापाचा पाला दुधांत कोळून तें दूध पाजावें. ( ४ ) मुलांस सर्दीचा विकार न होण्यास—नित्याच्या बाळगुटींत सतापाचीं तीन पानें उगाळून अगर चुरून ती बाळगुटी पाजावी; म्हणजे सर्दी व कफविकार होत नाहीं. ( ५ ) मुलांच्या खोकल्यावर—सतापाचा पाला दुधांत उकळून तें दूध पाजावें व हाच पाला काळ्या फडक्यांत बांधून ती पुडी मुलांच्या गळ्यांत बांधावी; म्हणजे कसलाही खोकला जातो. ( ६ ) मुलांच्या ससणीवर—सतापाचे पाल्याचा रस व बाबीचा रस एकत्र करून मध घालून द्यावा. ( ७ ) ज्वरावर-सतापाच्या पाल्याचा रस अंगास लावावा म्हणजे ज्वर निघून जातो. ( ८ ) मुलांच्या खोकल्यावर—सतापाच्या पाल्याचा रस व सुरपिणीच्या पाल्याचा रस काढून, त्यांत मध अगर गूळ घालून तो पाजावा व पाल्याचा चोथा फडक्यांत घालून तो गळ्यांत बांधावा. येणेंकरून मोठा दुस्तर खोकला असला तरीही तो त्वरित दूर होतो.

### ४. सप्ताळूं.

सप्ताळूंची उत्पत्ति सर्व उष्ण व समशीतोष्ण देशांत होते. हें फळ फार उत्तम असून सर्वांस याची आवड असते. या देशांत हीं झाडें फार ठिकाणीं नाहींत. परंतु हें झाड या देशांत हव्या त्या ठिकाणीं होण्यास अडचण नाहीं. ज्या फळांतील गीर घट्ट, त्वचा पातळ, ज्या बाजूवर नेहमीं उन्ह पडतें तिच्या दुसऱ्या बाजूचें अंग तांबडें भडक, अठी बारीक व आंत गीर पिंवळ्या रंगाचा व पुष्कळ असून रस विपुल असतो, तें फळ उत्तम असें समजावें.

### ५. सफरचंद.

या देशांत यांचें बीज इराणांतून आलें असावें. सफरचंद हें उत्कृष्ट मेव्यांपैकीं मेवा आहे. या देशांत पुष्कळ मोठमोठ्या लोकांच्या बागांत यांचीं झाडें आहेत. सफरचंद हें फळ लहानशा नारिंगाएवढें असतें. खालून वरून हें चपटें असतें. यावर पातळ साल असते. यांतील गीर टणक व रवरवीत असा असतो. वरील साल चाकूनें सोलून काढावी

लागते. हें फळ खाण्यास फारच उत्कृष्ट लागतें. हें फार गोड असतें. यास मधुर रुचि असते. याच्या कापट्या साखरेंत घालून ठेवल्या असतां फारच चांगल्या लागतात.

### ६. समुद्रफळ.

( सं. विषघ्ना. गु. व हिं. निर्विषी. फा. जद्वार. )

समुद्रफळाचीं झाडें मोठमोठीं होतात. याचीं पानें बदामाच्या पानांसारखीं असून त्यांहून थोडीं लहान असतात. हीं झाडें समुद्रकिनाऱ्यास होतात. यांस जीं फळें येतात तीं आकारानें जायफळाएवढीं असतात. याचा रंग काळसर असतो. या फळावर उभ्या सुरकुत्या असून याची त्वचा फार पातळ असते. समुद्रफळ हें अनेक रोगांवर चालतें. समुद्रफळ – उष्ण व कडू असून, त्रिदोष, भूतबाधा, भ्रम, शिरोरोग, दावानलदोष यांचा नाश करितें. हें पाण्यांत उगाळून दिलें असतां कृमीचा देखील नाश करितें. ( १ ) मुलांच्या कफविकारावर—समुद्रफळ थंड पाण्यांत, चार किंवा दोन गुंजा शक्तीप्रमाणें उगाळून, तें पाणी तीन माशांपासून एक तोळापर्यंत पाजावें. तेणेंकरून तत्काळ वांति होऊन कफ पडतो. उतार देणें तर तूप द्यावें. ( २ ) उसण ( हूक ) भरते त्यास—समुद्रफळ निंबाच्या रसांत उगाळून लावावें. ( ३ ) मुलांच्या पोटांत रक्ताची गांठ बनते त्यास—समुद्रफळ गाईच्या दुधांत उगाळून पाजावें. ( ४ ) डोळयाच्या पटलास—समुद्रफळ गाईच्या तुपांत उगाळून अंजन करावें. ( ५ ) कामिणीवर—समुद्रफळ उगाळून अंजन करावें व तिळाच्या तेलाच्या गुळण्या कराव्या. ( ६ ) पोटशूळावर—समुद्रफळ गाईच्या दुधांत उगाळून द्यावें. ( ७ ) अर्धशिशीवर—समुद्रफळ शेळीच्या मुतांत उगाळून नाकांत घालावें. ( ८ ) डोळयांतील फुलास—समुद्रफळ दोडकीचे रसांत उगाळून अंजन करावें. ( ९ ) खोकल्यावर—समुद्रफळ, सुंठ व पिंपळी यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. ( १० ) धोत्र्याचे विषावर—समुद्रफळ गोमूत्रांत उगाळून द्यावें. ( ११ ) सन्निपात-

ज्वरावर—समुद्रफळ पाण्यांत उगाळून अंजन करावें. ( १२ ) सर्प-दंशावर—समुद्रफळ लसुणाचे रसांत उगाळून अंजन करावें. ( १३ ) कृमीवर—समुद्रफळ पाण्यांत उगाळून द्यावें.

### ७. समुद्रशोक.

( सं. समुद्रशोष. लॅ. Argeria speciosa. अरजिरिया स्पेसिओसा. )

यास "समुद्रशोफ" असेंही म्हणतात. समुदशोकाचे वेल असतात. यांचा विस्तार मोठा होतो. याचीं पानें मोठीं असून त्यांवर रेषा असतात. पान साधारण तळहाताएवढें मोठें होतें. याचें बीं वीर्य-स्तंभक आहे. याच्या कोंवळ्या पानांची भाजी होते. समुद्रशोक – हा पित्तल, ग्राहक व किंचित् वातकारक असून, शैत्य व वात यांचा नाश करतो. ( १ ) वातविकारावर—अळवांच्या पानांच्या वड्यांप्रमाणें याच्या पानांच्या वड्या करून तुपांत परतून त्या खाव्या. ( २ ) गळवें आदिकरून पिकून फुटण्यास–समुद्रशोकाचीं पानें आणून ऊन करून बांधावीं.

### ८. साग.

( सं. शाक, खरच्छद. गु. साग. हिं. सागवान. फा. उजनुलफिल् फाफिल- गोस. इं. Indian teak tree, इंडियन टीक ट्री. लॅ. Tectona grandis. टेक्टोन ग्रांडिस. )

सागाचा वृक्ष मोठा होतो. मलबार, गुजराथ व ब्रह्मदेश या प्रांतांत याची उत्पत्ति फार होते. हा वृक्ष पन्नास हात उंच वाढतो व त्याचा परीघही मोठा होतो. हा वृक्ष जून होईपर्यंत त्याचें लाकूड फारसें उप-योगी नसतें. पक्क्या सागाच्या लांकडाची योग्यता शिसवीच्या लांकडा-बरोबर आहे. याचीं पानें मोठीं असतात. हीं चोळलीं असतां रक्तासा-रखा तांबडा रंग निघतो. सागाचें लांकूड सर्व लाकडांत जास्त टिकाऊ आहे. हें पाण्यांत कुजत नाहीं, व कडवट असल्यामुळें त्यास कीड लागत नाहीं. तारवें व घरें बांधावयास व दुसऱ्या सुतारकामास या लांकडाचा जेवढा खप आहे तेवढा दुसऱ्या लांकडाचा नाहीं. या झाडास 'साया' असेंही म्हणतात. सागाचें झाड—तुरट, शीतल, गर्भस्थैर्यकर

व गर्भसंधानकारक आहे. आणि रक्तपित्त, पित्त, मूळव्याध, वायु, कोड व अतिसार यांचा नाश करितें. याचीं फुलें—विशद, लघु, तुरट, कडु, वातकोपन व रुक्ष आहेत; आणि कफ, पित्त व प्रमेह यांचा नाश करितात. याची साल—मधुर, रुक्ष, तुरट व कफनाशक आहे. ( १ ) **मूत्राघातावर**—सागाची बीं अजमासें अर्धी, थंड पाण्यांत उगाळून द्यावीं; व ती बी उगाळून बेंबीवर लेप द्यावा. ( २ ) **मूतखड्यावर व शुक्राश्मरीवर**—सागाचें बीं पाण्यांत उगाळून द्यावें. ( ३ ) **सर्पदंशावर**—सागाचें मूळ उगाळून पोटांत द्यावें. ( ४ ) **रक्तबाऊ किंवा धावऱ्यावर**—सागाचीं सुकलेलीं पानें व कांबळ्याचा तुकडा जाळून राख करावी व ती तेलांत खलून लेप द्यावा. अथवा सागाचे ओल्या पानांचा रस काढून खापरांत आटवावा, आणि राबडीप्रमाणें दाट झाल्यावर लेप द्यावा. ( ५ ) **आगंतुक गर्मी व धातुस्थानच्या कडकीवर**—सागाच्या बिया शक्तीप्रमाणें व रोगाचा जोर दिसेल त्याप्रमाणें एकपासून तीनपर्यंत थंड पाण्यांत गंधाप्रमाणें उगाळून त्यांत जिऱ्यांची व खडीसाखरेची पूड घालून तें चाटावें. ( ६ ) **धातुस्थानची उष्णता व उन्हाळे यांवर**—पावशेर दूध व तितकेंच पाणी एकत्र करून त्यांत सागाच्या बियांचें चूर्ण दीड मासा टाकून ७ दिवस घ्यावें. ( ७ ) **श्लीपद, वल्मीक व मेदोरोगांवर**-सागाचे सालीचा काढा करून त्यांत गोमूत्र घालून तो द्यावा. ( ८ ) **फुरशाचा विषार उमळून रक्त वाहूं लागल्यास त्यावर**-सागवानाच्या पानाच्या कोंवळ्या तुवऱ्या [ अंकुर ] बारीक वांटून पाण्यांत कालवून तें पाणी सात तोळेपर्यंत पिण्यास द्यावें; म्हणजे लवकरच गुण येतो. ( ९ ) **शीतपित्तावर**—सागाचीं ओलीं पानें चुरून पाण्यांत घालून उकळून त्या पाण्यानें स्नान घालावें. ( १० ) **उन्हाळ्यावर**—तांदुळाचे धुणांत सागाच्या बिया एक दोन पर्यंत उगाळून त्यांत साखर घालून तें प्यावें.

## ९. सागरगोटा.

( सं. कुकचिका. गु. कांकच. हिं. करंजवा. आ. अक्तमक्त. फा. खाय-इबलीस. ते. कचकाई. इं. Bonduc nut बॉन्डक नट्. लॅ. Coesalpinia Bonduc सिसाल पिनिया ब्यॉन्डक )

यास 'गजगा' किंवा 'गजरा' असेंही म्हणतात. या झाडास कांटे असतात. यास लहान लहान शेंगा येतात. त्यांत सागरगोटे असतात. त्यांची साल फार कठीण असते; आंतील मगज औषधास उपयोगी पडतो. सागरगोटे मंद विस्तवांत भाजून घेऊन मग आंतील मगज काढून त्याची औषधांत योजना करावी. सागरगोटी—तुरट, कडवट, शोषक व उष्ण असून, कफ, शूल, सूज, आध्मान, व्रण, प्रमेह, कुष्ठ, कृमि, पित्तार्श, रक्तार्श, वातार्श व रक्तदोष यांचा नाश करिते. ( १ ) क्षय, बाळंतरोग व पोटशूळ म्ह० पोटदुखीवर —सागरगोटा भाजून चूर्ण करून तुपाशीं खावा. अथवा सागरगोट्याचें चूर्ण लसूण, सैंधव व हिंग यांच्याबरोबर खावें. ( २ ) सुजेवर—सागरगोटीचीं, रुईचीं व एरंडाचीं पानें वाटून ऊन करून लेप द्यावा, म्हणजे तीन दिवसांत सूज उत-रेल. ( ३ ) उर्दंशव्याधीवर—सागरगोटीच्या पाल्याचा रस काढून तूप घालून भात सात दिवसपर्यंत सेवन करावा. पथ्य तूप व भात. ( ४ ) जंत पडण्यास—सागरगोटीच्या पाल्याच्या रसांत आंबेहळद व पळसपापडी उगाळून द्यावी, अथवा सागरगोटा व हिंग भाजून त्यांत मीठ घालून तुपांत खलून पोटांत द्यावें. ( ५ ) वायगोळ्यावर—सागरगोटा भाजून पूड करून गुळाशीं खावी. ( ३ ) लहान वासरांस थंडी व कृमीवर—गजगा, ओंवा व लसूण एकत्र कुटून पाणी करून पाजावें. ( ७ ) ज्वरावर—सागरगोट्याच्या पाल्याचा रस चार तोळे-पर्यंत काढून त्यांत हिंग दोन गुंजांपर्यंत कालवून द्यावा. हें औषध विषमज्वराखेरीज सर्व ज्वरांवर तीन वेळ दिल्यानें गुण वाटूं लागतो. ( ८ ) आंवेवर—सागरगोटा अर्धकच्चा भाजून चूर्ण करून तें एक मासाभर चूर्ण साखरेंत घालून खावें. ( ९ ) मुलांचे पोटांत रक्ताची

**गांठ बनते त्यास**—सागरगोटीचे पाल्याचा रस मासे सहा व हिंग मासा १ भाजून पाण्यांत प्यावयास सात दिवस द्यावा. आठवे दिवशीं मोरचुदाची लाही अर्धा तांदूळभार, सहा मासे पाण्यांत पाजावी; म्हणजे काळें पिवळें परसाकडे होऊन गांठ साफ होऊन जाईल. (१०) **जिभेस खरे येतात त्यांस**--सागरगोटीच्या पाल्याच्या रसांत जिऱ्याची पूड घालून द्यावी. (११) **डब्यावर**--सागरगोटीचा पाला, बांबेचा पाला व शेळीच्या लेंड्या हीं एकत्र कुटून गोमूत्रांत शिजवून कोमट झाल्यावर त्याचा पोटावर पेंड (पट्टा) बांधावा. (१२) **ज्वरावर**--सागरगोटा भाजून चूर्ण करून तें मिऱ्याबरोबर द्यावें. (१३) **जंतावर**—सागरगोटा भाजून त्याचें चूर्ण तुपाशीं खावें व गुदद्वारास साळीच्या कोंड्याची धुरी द्यावी; म्हणजे दरोबस्त जंत पडतील.

## १० सागू (साबूदाण्याचें झाड.)

सागू हा वृक्ष भोले माडाची जात आहे. याची उंची तीस चाळीस हात असते. हें झाड जून झालें म्हणजे कापून, मधला गाभा काढून घेतात. नंतर तो कुटून त्याचें पीठ झालें म्हणजे त्यास पाण्याचा शिपका मारतात. मग तें चाळणींत घालून छानतात; तेणेंकरून त्याच्या बारीक गोळ्या होतात. त्यांस साबूदाणे असें म्हणतात. **साबूदाणे**--पाचक असून पौष्टिक आहेत. तसेंच मुलें, वृद्ध, रोगी व अशक्त यांस हे फार हितावह आहेत.

## ११. सातवीण.

(सं. सप्तपर्ण. गु. सातिवन, सप्तपर्ण. हिं. छितवन. बंगाली छुटिन. लॅ. Alstonia scholaris आलस्टोनिया स्कालरिस्.)

सातविणाचे वृक्ष मोठमोठे होतात. हे कोंकणप्रांतीं पुष्कळ आहेत. याचें लाकूड इमारतकामास फारसें उपयोगी पडत नाहीं. सातविणाचे एका डेंखास सात पानें असतात. या पानांचा आकार सांवरीच्या पानासारखाच लांबट असतो. सातविणाची साल अतिशय कडू आहे. **सातवीण**--दीपक, सारक, कडू, उष्ण, मदगंधि, सुगंधि, स्निग्ध, तुरट व

हृद्य आहे. आणि रक्तदोष, व्रण, कृमि, दमा, त्रिदोष, कुष्ठ, शूल व गुल्म यांचा नाश करितो. (१) **नळवायूस**—सातविणाची साल खोबऱ्याबरोबर खावी. दिवस ७. पथ्य करावें. (२) **उन्हाळ्यास**—सातविणाच्या डिऱ्यांचा रस साखर घालून द्यावा. उतार तूपभात. (३) **सांद्रमेहावर**—सातविणाच्या सालीचा काढा द्यावा. (४) **ज्वर, शूल व गुल्म यांवर**—सातविणाच्या सालीचा काढा द्यावा. (५) **व्रण भरून येण्यास**—सातविणाची साल दुधांत वाटून लेप करावा.

## ११. सांधरूख.

हें झाड मोठें होतें. याचीं पानें वीतभर लांब असून, तीं आकारानें कुड्याच्या पानासारखीं असतात. याची साल अस्थिभंगावर फारच उत्तम आहे. यांतील जें अव्वल प्रतीचें झाड असतें, त्यास "लवंगी सांधरूख" असें म्हणतात. याचा असा चमत्कार आहे कीं, याचें पान मधोमध चिरून ठेवलें व कांहीं वेळानें येऊन पाहिलें, तर त्याचा सांधा मिळून जाऊन पूर्ववत् पानाप्रमाणें पान होतें. हीं झाडें दक्षिण कोंकणांत कांहीं कांहीं ठिकाणीं आहेत. अशा अत्यंत उपयोगी व ज्यांच्यांत विलक्षण प्रभाव आहे अशा वनौषधी ईश्वरानें या भूमीवर उत्पन्न केल्या असून, आपल्या पूर्वजांनीं त्यांचा उपयोग करून आपल्या प्रकृतीचें रक्षण केलें व आपलें सामर्थ्य इतरांस उत्तम प्रकारें दाखविलें. त्यांच्याच वंशजांनीं हल्लींच्या काळांत अशा उपयुक्त वनौषधींचा उपयोग न करितां इतर मोहक वस्तूंस लुब्ध होऊन सर्वांस आपला कमीपणा कां दाखवावा? (१) **अस्थिभंगावर**—सांधरुखाची साल ठेंचून मोडलेल्या हाडावर तीन दिवस बांधावी.

## १२. सालंमिश्री. (सं. सालिमकंद.)

तुर्कस्थान, अरबस्तान व इराण या देशांत सालंमिश्रीचें उत्पन्न फार होतें. हिंदुस्थानांतही या कंदाच्या दोन तीन जाती सांपडतात. हें झाड कांहींसें नागदवणीच्या किंवा हळदीच्या झाडासारखें आहे. यास निकृष्ट प्रतीची जमीन लागते. त्याचें मूळ, ज्यापासून कोंब फुटून झाड

होतें, तें वेगळें असतें; आणि ज्यापासून सालंमिश्री व्हावयाची, तीं निराळीं असतात. या मुळ्या काढून आणून ऊन पाण्यांत धुतात. मग जाड खादीच्या कापडानें त्यांचें वरचें साल चोळून काढून टाकतात; तेणेंकरून त्या पांढऱ्या शुभ्र दिसतात. नंतर तांब्याच्या तव्यावर घालून त्यांस आंच देतात. हीच सालंमिश्री होय. सालंमिश्री फार पौष्टिक आहे. बहुतेक तुर्क व अरब, यांचेंच अन्न सेवन करितात. समुद्रामध्यें फार दिवस असल्यामुळें खलाशी लोकांस "नाविक रक्तपित्तरोग" होतो; त्यास सालंमिश्रीच्या पिठाची पेज करून दिली असतां त्यांचा उपद्रव कमी होऊन ते निरोगी होतात. सालंमिश्रींत सफेत, चराख, लसणिया, पंजेदार व दुध मुसळी अशा पांच जाती आहेत. सालंमिश्री--उष्णवीर्य, वृष्य, धातुवर्धक, कडु, मधुर, गुरु व रसायन आहे. आणि मेह, पित्त, रक्तविकार, क्षय, आमदोष, कामला व विशेषेंकरून कुंभकामला यांचा नाश करिते. (१) प्रदर व धातुविकार यांवर—दररोज प्रातःकाळीं व सायंकाळीं घटका दिवसास सालंमिश्री, सफेत मुसळी व पंजाबी मिश्री या तीन जिनसांचें समभाग फार बारीक तीन मासे चूर्ण तीन मासे खडीसाखरेबरोबर दर वेळीं तीन तोळे दुधांत मिळवून घ्यावें. म्हणजे वरील रोग दूर होऊन पुष्टताही येते. (२) पुष्टतेस--सालंमिश्रीचा पाक करून खावा, किंवा सालंमिश्रीचें चूर्ण करून पाणी व दूध यांत शिजवून त्यांत साखर घालून तें सेवन करावें. (३) संग्रहणीवर---मुसळी ताकांत किंवा तांदुळाचे धुवणांत वांटून एक तोळा द्यावी, व पथ्याला ताकभात द्यावा. (४) पुष्टतेस व मलशुद्धि साफ होण्यास--सालंमिश्रीचीं फुलें (हीं मोतरिंगणीच्या फळासारखीं असून यांतील बीं अतिशय कठीण असते.) ४ तोळे, ५ शेर (कच्चे) दुधांत टाकून खवा करावा व तो तसाच एक रात्र ठेवावा. नंतर त्यावर पाणी येतें तें पहिले दिवशीं प्यावें; व दुसरे दिवसापासून खव्यांत खडीसाखर ४० तोळे व तूप ४० तोळे, एक करून तें मिश्रण दररोज २ तोळे खावें.

## १३ सालवण.

( सं. शालिपर्णी. गु. समेरवो. हिं. सरियन. लॅ. Desmodium Gangeticum. डेस्मोडियम् गंगेटिकम् )

या झाडास ' रानगांजा, ' ' भद्रेशवरा ' किंवा ' डाय ' असेंही म्हणतात. सालवणीचीं झाडें जास्वंदीचे झाडांप्रमाणें असून तिचीं पानें पारिजातकाचे पानांसारखीं, परंतु त्यांहून लांब व रुंद असतात. याचा देंठ चार अंगुलेंपर्यंत पिवळट रंगाचा असतो. पानास कात्रे असतात. दशमुळांत सालवणीचें मूळ येतें. लघुपंचमूळ हें पित्तावर योजावें व बृहत्पंचमूल हें वायु व कफ यांवर योजावें. **सालवण**-- गुरु, उष्ण, धातुवर्धक, रसायन, स्वादु, वृष्य व रसकाळीं कडू आहे. आणि विषमज्वर, वायु, मेह, अर्श, सूज, संताप, ज्वर, दमा, कृमि, त्रिदोष, शोष, वांति, क्षत, खोकला, व अतिसार यांचा नाश करिते. **लघूपंचमूळ**--स्वादु, किंचित् उष्ण, लघु, ग्राहक, कडू, बलकर व धातुवर्धक; आणि वातपित्त, पित्त, वायु, कफ, दमा, ज्वर, खोकला, अश्मरी, त्रिदोष, शूल, अरुचि, अग्निमांद्य यांचा नाश करितें. **बृहत्पंचमूळ**— अग्निवर्धक, तीक्ष्ण, तुरट, मधुर, उष्ण, पाककाळीं लघु व कडू आहे. आणि मेदोवृद्धि, कफ, वायु व खोकला यांचा नाश करितें. **दशमूळ**-झांपड, त्रिदोष, दमा, खोकला, ज्वर, सूज, आनाहवायु, उचकी, पनिस, पार्श्वपीडा, मस्तकशूल, अरुचि, घाम, अपतंत्रक वायु, अग्निमांद्य यांचा नाश करितें. ( १ ) **दशमूलादि काढा**, शूल, हृद्रोग व श्वास यांवर— सालवण, पिठवण, रिंगणी, डोरली व गोखरू हीं लघुपंचमुळें; बेल, टाकळी, टेंटू, पाडळ व शिवण हीं बृहत् पंचमूळें; या दशमुळांचा काढा करून जवखार व सैंधव मिळवून द्यावा. ( २ ) **हृदयशूल, पृष्ठिशूल व कटिशूल यांवर**— दशमूळांचा काढानिकाढा द्यावा. ( ३ ) **बाळंतरोगावर**— दशमूळांच्या काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें. ( ४ ) **मूढगर्भ** ( गर्भ आडवा येणें ) त्यास व मृतगर्भ पडण्यास— सालवणीच्या मूळाचा लेप बस्ति व भग यांना

करावा ह्मणजे गर्भ नीट होतो. ( ५ ) **मोह, झांपड व संनिपात ज्वर यांवर**--दशमूळांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा. ( ६ ) **वात-गलगंडावर**— दशमूळ वटून लेप करावा. ( ७ ) **संनिपात-योनिशूलावर**— दशमुळें, बलफळ व धायटीचीं फुलें यांच्या काढ्यांत कापूस भिजवून योनींत धारण करावा. ( ८ ) **कर्णशूलावर**— बृहत्पंचमूळें आठ अंगुळ प्रमाण घेऊन त्या मूळांना कापूस गुंडाळून तेलांत भिजवून अग्नीनें चेतवावीं; व तीं मुळें उभीं धरून त्यांपासून जें तेल खालीं गळेल तें किंचित् गरम करून कानांत घालावें. कानाची तिडीक तत्काळ दूर होते. ( ९ ) **अर्धशिशीवर**—सालवणीचा काढा करून नाकांत घालावा. ( १० ) **मेदोरोगांवर**— बृहत्पंचमूळांचा काढा, आंत मध घालून द्यावा. ( ११ ) **गर्भपात झाला असतां उपचार**—लघुपंचमूळांचा काढा करून त्यांत शिजविलेली पेज तूप घातल्याखेरीज द्यावी. ( १२ ) **तेलानें भाजलेल्या व्रणावर**--जुनी सालवण आणून तिची राख करावी, व ती पाण्यांत कालवून लावावी. ( १३ ) **अर्धांगवायूवर**—दशमूळांचा काढा, हिंग व सैंधव घालून द्यावा. ( १४ ) **धनुर्वातावर**—दशमूळांचा काढा द्यावा व शिरसेल अंगास चोळावें. ( १५ ) **पंचमूलीक्षीर, जीर्णज्वर, श्वास, कास, मस्तकशूल, पाठीचा शूल व पडसें यांवर**—लघुपंचमूळांच्या मुळ्या आणून थोड्या कुटून त्यांत आठपट दूध व दुधाचे चौपट पाणी घालून दूध राही तों कढवून प्यावें. संपूर्ण जीर्णज्वरावर दुधाचें औषध उत्तम आहे असें जाणावें. ( १६ ) **कफ, पांडु, ज्वर, अतिसार, सूज, संग्रहणी, खोकला, अरुचि, कंठरोग व हृद्रोग यांवर**—दशमूळें व सुंठ यांचा काढा द्यावा. ( १७ ) **श्वास, कास व पार्श्वशूल यांवर**— दशमूळांचा काढा करून त्यांत एरंडमूळाचें चूर्ण घालून प्राशन करावें. ( १८ ) **पोटाची फुगवटी व शूल यांवर**--दशमूळांच्या काढ्यांत एरंडेल, हिंग व पादेलोण घालून तें प्यावें. ( १९ ) **मूत्रकृच्छ्र व मूत्राश्मरी यांवर**—लघुपंचमूळांचा काढा द्यावा. ( २० )

वातकुंडलिका, अष्ठीला, वातबस्ती वगैरे मूत्ररोगांवर--दशमुळांचा काढा शिलाजित व साखर घालून द्यावा. ( २१ ) वातोदर, सूज व शूल यांवर--एरंडेल दशमुळाचे चूर्णांत मिश्र करून द्यावें; अथवा दशमुळांचा काढा गोमूत्र अथवा शिलाजित व दूध घालून द्यावा. ( २२ ) अर्धशिशी, सूर्यावर्त व मस्तकशूलावर--दशमूळांचे काढ्यांत तूप व सैंधव घालून त्याचें नस्य द्यावें. ( २३ ) उन्मादरोगावर--दशमूळांचा काढा तूप घालून द्यावा.

## १४ सांवर.

( सं. शाल्मली गु. शेमळो. हिं शाल्मली, सेंवर. इं. silk cotton tree सिल्क कॉटन ट्री. लॅ. Bombax malabaricum बॉम्बक्स मेलेबेरिकम् )

हा वृक्ष मोठा होतो. याच्या सर्वांगास कांटे असतात, म्हणून यास " कांटे सांवर " असेंही म्हणतात. हा दोनतीनशें वर्षेपर्यंत वांचतो. याच्या दोन जाती आहेत; एक पांढरी व दुसरी तांबडी. यास कार्तिक मार्गशीर्ष या महिन्यांत फुलें येऊन चैत्राच्या सुमारास फळें लागतात. तीं जून झालीं म्हणजे ओलीं असतांच काढून फोडून वाळवितात व आंतील कापूस काढून घेतात. सांवरीचा कापूस फार मृदु असतो, म्हणून श्रीमंत लोक त्याच्या गाद्या व तक्के करितात. त्यास पिंजण्याची मेहनत लागत नाहीं. याचें लांकूड फार कठीण व चिवट असतें. तें पाण्यांत लवकर कुजत नाहीं. त्याच्या होड्या करितात. सांवरीस लाल रंगाचा गोंद येतो. त्यास " मोचरस " असें म्हणतात. सैंधव व तुपाची फोडणी टाकून सांवरीच्या फुलांची भाजी करून खाल्ली असतां कष्टसाध्य प्रदर, रक्तपित्त, कफ यांचा नाश होतो. सांवरीचें झाड--मधुर, वृष्य, बलकर, तुरट, शीतल, पिच्छल, लघु, स्निग्ध, स्वादु, रसायन, शुक्रकारक, कफकर, धातुवर्धक; व रक्तपित्त, पित्त, रक्तदोष यांचा नाश करितें. याच्या सालीचा रस--ग्राहक, तुरट, कफनाशक आहे. हिचीं फुलें--शीतल, कडू, गुरु, स्वादु, तुरट, वातल, रुक्ष; व कफ, पित्त व रक्तदोष यांचा नाश करितात. फळांचे गुण याचप्रमाणें आहेत. हिचा कांदा

मधुर, शीतल, मलस्तंभक; व दाह, पित्त व संताप यांचा नाश करितो. **कटुशाल्मली** ( सांवरीचा भेद )- कडू, तिखट, भेदक, उष्ण; व कफ, वायु, प्लीहा, गुल्म, यकृत, विषदोष, भूतबाधा, मलस्तंभ, मेद, रक्तदोष व शूळ यांचा नाश करितो. **मोचरस**–तुरट, ग्राहक, बलकर, पुष्टिकारक, धातुवर्धक, वर्णकारक, बुद्धिप्रद, शीतळ, वयःस्थापक, वृष्य, गुरु, स्वादु, रसायन, स्निग्ध, कफकर, गर्भस्थापक, वातनाशक; व अतिसार, प्रवाहिका, रक्तरोग, पित्त, दाह, आमातिसार व रक्तातिसार यांचा नाशक आहे. ( १ ) **प्रदरावर**–सांवरीच्या सालीचें चूर्ण दुधांत द्यावें. अथवा सांवरीच्या कांट्याचें चूर्ण साखर व दूध घालून द्यावें. **मूत्रकृच्छ्रावर** –सांवरीच्या सालीचें चूर्ण करून साखरेशीं द्यावें. ( २ ) **वृश्चिकदंशावर**–पुष्यार्कीं आपली छाया झाडावर पडूं न देतां उत्तरेकडील पांढऱ्या सांवरीची मुळी आणून ठेवावी. ही मुळी विंचू चढला असेल तेथून खालपर्यंत तीन वेळ उतरावी व थोडी उगाळून दंशस्थानीं लावावी. ( ३ ) **गर्माच्या आजारावर**- साधारण लहान पांढऱ्या शेवरीचें झाड खणून त्याच्या मुळाचा कंद वाटून सांवलींत सुकवावा व त्याचें चूर्ण करावें. नित्य पांढऱ्या सांवरीची साल गाईच्या दुधांत उगाळून, त्यांत कंदाचें पीठ सहा मासे व खडीसाखर एक तोळा घालून द्यावें. हें औषध प्रतिदिवशीं दोन वेळ प्रमाणें २१ दिवस द्यावें व पथ्य करावें; म्हणजे उपदंशाचे सर्व विकार शमतात. ( ४ ) **धातुपुष्टतेस**–मोचरसाचें चूर्ण अर्धा तोळा, खडीसाखर ४ तोळे व गाईचें दूध पक्का पावशेर इतकें एकत्र करून द्यावें. ( ५ ) **धातुपुष्टतेस**–कांटे सावरीचें ओलें मूळ चार तोळे ठेंचून, गाईच्या पावशेर दुधांत रात्रीं भिजत घालून सकाळीं गाळून त्यांत खडीसाखर १ तोळा घालून ७ दिवस घेतल्यानें धातु पुष्ट होऊन वीर्यपतन बंद होतें. ( ६ ) **शरीर बळकट होण्यास**–मुळाच्या सालीचें चूर्ण मध-साखरेशीं द्यावें. ( ७ ) **अग्निदग्धव्रणावर**- सांवरीचा कापूस वाटून पाण्यांत लेप करावा. ( ८ ) **पानथरीवर**–सांवरीचीं फुलें वाफून रात्रभर शिळीं झाल्यावर त्यांत मोहऱ्यांचें चूर्ण घालून द्यावीं. ( ९ )

**वीर्यपतनावर**-पांढऱ्या सांवरीचा लहानसर कांदा चूर्ण करून खडीसाखरेबरोबर खाण्याला द्यावा. ( १० ) **बद पिकण्यास**—कोंवळ्या सांवरीचा कंद काढून स्वच्छ धुवावा आणि त्याजवरील साल खरडून काढून कुटावा; म्हणजे दोरट बोळ येईल; तो बोळ बदांवर बसविला असतां दाहशमन होऊन गांठी त्वरित पिकतात. ( ११ ) **सुरामेहावर**--सांवरीच्या सालीचा काढा करून द्यावा. ( १२ ) **थंड प्रमेहावर**—पांढऱ्या सांवरीचा कंद सोलून त्याचे पातळ तुकडे करून चांगला सुकवून पीठ करून ठेवावें नित्य प्रातःकाळीं गाईचें तूप १ तोळा घेऊन त्यांत हें पीठ अर्धतोळा व जायफळाची पूड २ गुंजापर्यंत घालावी. व खडीसाखरेची पूड सहा मासे घालून प्रत्यहीं दुवक्त द्यावें. सांवरीचा कंद न मिळाल्यास सालीचें चूर्ण द्यावें ( १३ ) **जीर्णातिसारावर**-मोचरसाचें चूर्ण ३।४ मासे, साखरेंतून द्यावें. ( १४ ) **अतिसारावर**—सांवरीची साल उगाळून द्यावी, अथवा सालीचा रस द्यावा. किंवा मूळ उगाळून द्यावें. ( १५ ) **मूत्रांतून धातू किंवा खर जात असल्यास**-पांढऱ्या सांवरीची साल गाईच्या निरसे दुधांत उगाळून, जिरें व पिठीसाखर घालून नित्य दोन वेळ प्रमाणें १४ दिवस द्यावी. ( १६ ) **हृद्रोगादिकांवर**—सांवरीची साल दुधांत शिजवून एक महिना घेतली असतां, ती रसायन, उत्कृष्ट, बलकर आणि वातनाशक आहे. हीच एक वर्षपर्यंत घेत गेलें असतां मनुष्य शंभर वर्षें वांचतो. ( १७ ) **देवी कधींहि न येण्यास**—सांवरीचा रस व पांढरा चंदन, किंवा अडुळशाचा रस व ज्येष्ठमध अथवा जाईचा रस व ज्येष्ठमध यांतून प्रारंभीं एक प्राशन केला असतां त्याला कधींही देवी येणार नाहींत.

## १५. साळ ( भात. )

( सं. शालि. गु शालिओ, शाल्य, चोखा. हिं. चाकर, चावल. का. नेल. फा. निरंज. आ. उरज. इं. rice राईस. लॅ. Oryza Sativa. ओरिझा साटिव्हा. )

या धान्याचा, जगांतील सर्व वस्तींत थोडाबहुत उपयोग होतो. याची उत्पत्ति बहुतेक उष्ण देशांत होते. या देशांत हें धान्य सर्वत्र

होते. बंगाल्यांत उंच प्रतीचा फार बारीक तांदूळ पिकतो. इंग्लंडांत व यूरोपांत बंगाल्याहून शेंकडों खंडी तांदूळ जातो. हें धान्य गुडघ्य पासून तों एक पुरुषभर उंच वाढतें. याच्या सर्व पात्या असतात. या पात्या वाळल्या म्हणजे त्यांस पेंढा असें म्हणतात. या पात्यांतून वाटोळी पोकळ एक काडी येते. त्या काडीच्या शेवटास भाताची लोंब येते. हींत भात असतें. यांत जो दाणा असतो त्यास तांदूळ असें म्हणतात. भातात जितक्या जाती आहेत, तितक्या कोणत्याही धान्यांत नसतील. देशावर भाताचें उत्पन्न फारसें नियत नाहीं, त्यामुळें तेथें याच्या पुष्कळ जातीही पिकत नाहींत. जीं भातें तीन पासून चार साडेचार महिन्यांत पिकतात, त्यांस ' हळवी ' असें म्हणतात; व ज्यांस पांचपासून सहापर्यंत महिने लागतात, त्यास ' गरवी ' असें म्हणतात. गरवी भातें अव्वल प्रतीच्या जमिनींत पिकतात. कमोद, बंगाली कमोद, पंकसाळ, आंबेमोहोर, रायभोग, जिरेसाळ, काळी साळ, तांबसाळ, खिरसाळ, चिमणसाळ, वांकसाळ, कोथिंबिरे, राजावळ, वेलची, काशिपटणी, मोरीसाळ, टाकळा इत्यादि जातीचीं भातें उत्तमांपैकीं होत. साळीचा अतिशय उपयोग होतो. तांदुळाचें अन्न शीतळ व शक्त्युत्पादक आहे. पुष्कळ लोकांचें मुख्य खाद्य तांदुळ हेंच आहे. भाताचे पुष्कळ निरनिराळे प्रकार होतात. त्याचे तांदूळ करून शिजवून त्यांचा भात करितात. भाताची पेज शीतळ व फार पौष्टिक आहे. तांदूळ दळून त्याच्या पिठाच्या दशम्या, भाकरी, पोळ्या, पानगे असे पदार्थ करितात. तांदुळाची खीर चांगली होते. तांदुळाचें उत्तम पक्वान्न केशरीभात होय. तांदुळापासून मोदक, शेंगा, इत्यादि दुसरीं पक्वान्नें होतात. तांदुळाच्या कण्यांची अथवा भरड्याची कांजी करितात, तीस कण्हेरी असें म्हणतात. लहान मुलें, रोगी व अशक्त अशांना ही कण्हेरी फार उपयोगी आहे. तांदुळांत तुरीची डाळ घालून त्यांची खिचडी करितात. ही साध्या भातापेक्षां पौष्टिक आहे. भाताचे पोहे करितात. तसेच कुरमुरे, लाह्या इत्यादि पदार्थ करितात. पेंढा गुरांस खावयास उपयोगीं पडतो.

भाताच्या तुसाचाही पुष्कळ उपयोग होतो. **रायभोगसाळी**-या पांढऱ्या, काळ्या व तांबड्या अशा तीन प्रकारच्या आहेत. त्या स्निग्ध, मधुर, अग्निदीपक, बलकर, कांतिकर, धातुवर्धक, पथ्यकारक, त्रिदोषनाशक व लघु अशा आहेत. या एकाहून एक गुणांनीं अधिक आहेत. **तांबड्या साळी**—लघु, स्निग्ध, मधुर, पथ्यकारक, बलकारक, वर्णकारक, चक्षुष्य, अग्निदीपक, मूत्रल, शुक्रल, स्वर्य, हृद्य व पुष्टिकारक असून, त्रिदोष, रक्तरोग, दाह, व्रण, वायु, विष, पित्त, श्वास, कास व ज्वर यांचा नाश करितात. **पांढऱ्या साळ्या साळी**—रुचिकर, शीतल, बलकर, पथ्य, वीर्यवर्धक, ग्राहक, दीपन, गोड; व ज्वर व त्रिदोष यांचा नाश करितात. **काळया साठया साळी**--गुणांनीं अधिक आहेत. **देवभात**-हें कृष्ण, पाटल, शालीमुख, कुक्कुटांड, जंतुभेद असें पांच प्रकारचें; तें पाककाळीं मधुर, शीतल, मलस्तंभक, अभिष्यंदकारक असें आहे. यांत कृष्ण हें गुणांनीं अधिक आहे. ( १ ) **पावसाळयांत पायास चिखल्या होतात त्यास**--भाताचा पेंढा जाळून पायांना धुरकट रंग येई पावेतों धुरी द्यावी. ( २ ) **अष्टगुणमंड, ज्वरावर**—किंचित् भाजलेले तांदूळ व मूग हे समान घेऊन त्यांत चौदापट पाणी घालून शिजवावें. शिजते वेळीं त्यांत हिंग, सैंधव, धणे, सुंठ, मिरीं, पिंपळी घालून, नंतर त्यांतील शीतकण न येऊं देतां पेज ओतून घ्यावी. हा मंड ज्वर, त्रिदोष यांचा नाशक; रक्त व क्षुधा यांना वाढविणारा, बलकर व बस्तिशोधक आहे. ( ३ ) **सरद गरमीस**-बारीक तांदूळ सायंकाळीं शिजत ठेवून त्यांचें उतरवणी कोऱ्या मडक्यांत घालून तोंड बांधून रात्रीं दहिंवरांत ठेवावें. प्रातःकाळीं त्यांत खडीसाखर घालून सूर्योदयापूर्वीं द्यावें. दिवस सात. ( ४ ) **मूत्ररेचन**-पांढरे तांदुळांचे धुणांत साखर व सोरमीठ घालून द्यावें. ( ५ ) **भांगेस उतारा**—तांदुळाचें धुवण पिण्यास द्यावें. ( ६ ) **शोषरोगावर**—साळीच्या लाह्यांचा काढा करून द्यावा. ( ७ ) **तृषारोगावर**--तांदुळाचे धुणांत मध घालून द्यावा. ( ८ ) **अग्निदग्ध व्रणावर**—साळीचा कोंडा जाळून त्याची राख तुपांत खलून लावावी. ( ९ )

भस्मकरोगावर---तांदूळ, शुभ्र कमळें किंवा कमळाक्ष, शेळीचे किंवा म्हशीचे दुधांत शिजवून तूप घालून भक्षावें. ( १० ) अर्धशिशीवर-सूर्योदयाच्या अगोदर सुमारें दोन मुठी साळीच्या लाह्या, मधाबरोबर खाव्या व झोंप घ्यावी. ( ११ ) मधुऱ्यावर---एक शेर पाण्यांत १ तोळा साळीच्या लाह्यांचें पीठ घालून, त्यांत सोन्याची अंगठी अथवा पुतळी टाकावी आणि अष्टमांश काढा करून घ्यावा. ( १२ ) दाह शमन होण्यास---साळीच्या लाह्या आणि खडीसाखर एकत्र करून काढा करून ठेवावा आणि वारंवार देत रहावें.

## १६. सुरंगी. ( सं. सुरपुन्नाग. )

हा वृक्ष मोठा होतो. हा वृक्ष बहुतेक उंडणीच्या वृक्षाप्रमाणें दिसतो. पानें उंडणीच्या पानाप्रमाणेंच असतात. हीं झाडें विशेषेंकरून कोंकण-प्रांतींच आहेत. कोंकणांत सुरंगीला ‘ गोडी उंडण ’ असें म्हणतात. सुरंगीच्या फुलांचा भर माघ-फाल्गुनांत असतो. यास फार वास येतो. झाड लावल्यापासून पांच सहा वर्षांनीं फुलें येऊं लागतात. याचें लांकूड इमारतकामास उपयोगीं येतें. सुरंगीचे कळे फुलल्याशिवाय सुकवून ते देशावर रंगाकरितां जातात. या कळयांचा रंग, रेशीम व मलमल वगैरे उंची कपडे रंगविण्याकडे फार होतो. सुरंगीचें झाड कडू व हिचे गुण उंडणीप्रमाणें असून, ही उंडणीहून गुणांनीं अधिक आहे.

## १७. सुरण. ( सं. गु. व हिं. सूरण. )

सुरण हिंदुस्थानांत बहुतेक भागांत होतो. तरी मलबार येथें याचें पीक फार आहे. हा कंद चैत्रवैशाखांत लावतात व मार्गशीर्षपौषामध्यें तो खणून काढतात. कोणी कोणी तो मोठा व्हावा म्हणून तीन वर्षेंपर्यंत जमिनींत ठेवतात. असा ठेवलेला सुरण एक ओझ्याचा देखील असतो. सुरणाची आकृति वाटोळी चाकासारखी असते. साधारणपक्षीं सुरणाचें वजन मण पाऊण मण असतें. यांत दोन जाती आहेत; एक खाजरी आणि एक गोडी. खाजरा सुरण खाल्ला असतां तोंड सुजतें व अनेक विकार होतात. परंतु तो औषधास उपयोगीं पडतो. हे सुरण पांच सहा

वर्षे देखील जमिनींत असतात. देशावर सुरणाची उत्पत्ति फारशी नाहीं. सुरणाच्या झाडाचा सोट मनगटाएवढा असून, त्यावर विस्तीर्ण छत्रीसारखें पान असतें. या दांड्याचा रंग पांढरवट असून त्याजवर शुभ्र रंगाचे ठिपके व चट्टे जागजागीं असतात. सुरण हा अर्शरोगनाशक आहे. म्हणून यास 'अर्शोघ्नः' असेंही नांव आहे. सुरणास फाल्गुन–चैत्राच्या सुमारास फूल येतें. त्याची भाजी सरस होते. याच्या कोंवळ्या पाल्याची भाजी करून खातात, व जून झाल्यावर मधल्या दांड्यांची भाजी करितात. सुरणाची भाजी चांगली होते. या भाजीस तुपाची फोडणी देतात. सुरण उष्ण व पौष्टिक आहे. **सुरण**—रुचिकर, तिखट, उष्ण, अग्निदीपक, रूक्ष, तुरट, छेदीं, लघु, पित्तकोपन, विशद, पाचक, मलस्तंभक; व शूल, अर्श, गुल्म, कफ, कृमि, मेद, वायु, अरोचक, दमा, प्लीहा, खोकला, वांति यांचा नाश करितो. हा रक्तपित्ती, कुष्ठी व दद्रुरोगी यांना हितकारक होत नाहीं. **याचा दांडा**—दीपन, रुच्य, लघु; व वायु, कफ, अर्श यांचा नाश करितो. (१) **मूळव्याधीवर**—सुरणाच्या कापट्या तुपांत तळून खावयास द्याव्या. (२) **आंवेवर**—सुरणाचा कांदा वाळवून चूर्ण करावें व तुपांत तळून द्यावें. किंवा तुपांत तळून साखर घालून द्यावें. (३) **सुरणवटक, मूळव्याधीवर**—सुरण वाळवून चूर्ण करून ३२ तोळे घ्यावें; चित्रक १६ तोळे, सुंठ ४ तोळे, मिरें २ तोळे घ्यावीं. साऱ्या औषधांचें चूर्ण करून त्याच्या दुप्पट गूळ घालून गोळ्या करून घ्याव्या. म्हणजे सहा प्रकारची मूळव्याध दूर होते.

## १८. सूर्यफूल.

(सं. अर्कपत्रा, सूर्यावर्त. गु. सूरजमुखी, हिं. सोंचली. हुरहुज. फा. गुले अफताव ते. सूर्यकांतिपुष्प इं. sunflower सन्फ्लावर. लॅ. Helianthus हेलिअंथस्.)

सूर्यफुलांचीं झाडें लहान लहान असून तीं सुमारें अडीच–तीन–चार हात उंच वाढतात. या झाडाचीं पानें लांबट, मोटीं व कात्रेदार असतात. या झाडास जें फूल येतें तें तळहाताएवढें रुंद असून राखडीसारखें असतें.

या फुलाचा असा चमत्कार आहे कीं, याचें तोंड नेहमीं सूर्याच्या बाजूकडे असतें. म्हणजे प्रातःकाळीं पूर्वेस असतें, दोनप्रहरीं समोर होतें व सायंकाळीं पश्चिमेस होतें. या फुलांत करडयाएवढया पांढऱ्या बिया असतात. त्या बियांचें तेल काढल्यास तिळाच्या व कर्डईच्या तेलापेक्षां विशेष उपयोगाचें होऊन, शरीरप्रकृतीसही हितावह होणारें आहे. हें झाड लावण्यास जमीन साधारण तांबडी असून ओलसर असावी. फुलांचें बीं मळून काढून घेतल्यावर तो भुगा गुरें आवडीनें खातात. याची पेंड गुरांस उपयोगी आहे. या झाडापासून दुसरा एक मोठा फायदा आहे. ज्यांच्या घरांत नेहमीं ओल येते व त्यामुळें घरांतील हवा कुंद होऊन ती रोगमूलक होते, त्यांनीं आपल्या घराच्या आसपास सूर्यफुलांची झाडें अवश्य लावावीं. या झाडांच्या अंगीं रोग उत्पन्न करणारी पाणथळाजवळची सर्व घाणेरडी वाफ शोषून घेण्याची शक्ति असते. याजकरितां हीं झाडें आसपास लावल्यानें सर्व रोगजनक वायु लवकरच नाहींसा होतो; आणि ताप, संधिवायु यांसारखे थंडीपासून होणारे आजार तेथून सत्वर पळ काढतात. या झाडास "सूर्यकमळ" असेंही म्हणतात.

**सूर्यफूल**—झाड-उष्णवीर्य, अग्निदीपक, स्वर्य, रसायन, तिखट, कडू, **तुरट**, सारक, लघु, रूक्ष; आणि कफ, वायु, रक्तदोष, ज्वर, दमा, खोकला, विस्फोट, कुष्ठ, मेह, अरुचि, योनिशूल, अश्मरी, मूत्रकृच्छ्र, पांडु, गुल्म यांचा नाश करितें. (१) **भूतज्वरावर**—सूर्यफुलाचें मूळ कानांत ठेवावें. (२) **शीघ्र प्रसूतीस**—सूर्यफुलाचें मूळ केंसांस बांधावें. (३) **मुलाच्या पोटांतील डब्यावर**—सुर्यफुलांचा रस दहा थेंबपर्यंत शक्त्यनुरूप दुधांत द्यावा. उलट्या तोंडाचा डबा असल्यास करांगुळीएवढी बारीक छिद्राची नळी घेऊन, त्या नळींत सूर्यफुलाचें वस्त्रगाळ चूर्ण करून भरावें; व त्या नळीचें एक टोंक मलद्वारांत चालवून, दुसऱ्या तोंडाकडून जोरानें फुंकावें. म्हणजे औषध रोगावर पोंचतें, आणि रोग फूटून पडतो. (४) **विंचवाचे विषावर**—सूर्यफुलाच्या पाल्याचें नस्य द्यावें व लेप द्यावा. (५) **जुलाब होण्यास**—याच्या तेलाचा नाभीस ठिपका

द्यावा, व जुलाब बंद होण्यास हें तेल माकडहाडास लावावें. (६) स्त्रीचें अंग बाहेर आलें तर- सूर्यफुलाचा रस हातास लावून तो अंगास माखावा. दिवस तीन.

## १९. सोमवल्ली.

(सं. सोमवल्ली, सोमक्षीरी. गु. सोमलता. हिं व का. सोमवल्ली. ते. पल्लटीजी. लॅ. Sarcostimma brevistigma. सारकोस्टिमा ब्रेव्हिस्टिग्मा.)

सोमवल्लींत लहान व मोठी अशा दोन जाती आहेत. हिला शुक्लपक्षांत १५ पानें येतात व तीं कृष्णपक्षांत गळून पडतात. सोमवल्ली ही दिसण्यांत शेरासारखी दिसते. हिचा रंग हिरवा असतो. हीस "अपत्रवल्लिका," "ब्राह्मी" अशींही नांवें आहेत. ऋग्वेदांत सोमवल्लीचें महत्त्व फारच वर्णिलें आहे. सोमवल्लीच्या रसांत बुद्धि वाढविण्याचा गुण असून तो मदिरेसारखा मद उत्पन्न करीत नाहीं. हिच्या देंठांतून प्राचीन काळीं एक मद्य तयार करीत असत. सोमवल्ली-ही तिखट, कडू, रसायन व त्रिदोषहारक आहे. (१) कावीळ व यकृत विकारावर—सोमवल्लीचे देंठ सुकवून त्यांचें चूर्ण करून द्यावें. (२) ज्वरावर—कोंवळ्या पानांचा काढा द्यावा.

## २०. स्थलकमलिनी.

(सं. व गु. स्थलपद्मिनी. हिं. स्थलकमलिनी. लॅ. Ionidium suffruticosum आयओनिडियम् सुफ्रटिकोसम्.)

पाण्यामध्यें होणाऱ्या जलकमलिनीप्रमाणें वनांत स्थलकमलिनीची वेल होते. हीस "पद्मावती," "पद्मचारिणी" अशींही नांवें आहेत. स्थलकमलिनी-ही शीतल, कडू, तुरट, स्तनांला घट्ट करणारी, लघु व तिखट अशी आहे; व कफ, पित्त, मूत्राश्मरी, मूत्रकृच्छ्र, वायुशूळ, अतिसार, वांति, दाह, मोह, मेह, रक्तविकार, दमा, फेंपरें, विष आणि खोकला यांचा नाश करते.

## २१. सवजा ( मरवा ).

( सं. वेधी, मरूजक. गु. मरवो. हिं. मरूवा, गेद, ते. रुद्रजाड. आ. मर्जंजुस्. इं. Sweet Marjoran स्वीट मार्जोरन् लॅ. Origanum Marjorona ओरिगनॅम् मार्जोरोना. )

सबजाचीं झाडें रानतुळशीच्या झाडांसारखीं असतात. यांची उंची सुमारें दोन तीन हात असते. पानेंही तुळशीसारखीं असतात. या पानांस कात्रे असतात. मुसलमान लोक या झाडाचे फार भोक्ते आहेत. यास तुळशीचे झाडाप्रमाणें मोठाले तुरे येतात. त्यांत काळसर रंगाचें बीं असतें. या बियांस " तुकुमराई " असें म्हणतात. सबजाच्या झाडाच्या दर्पानें सर्प बहुधा या झाडाजवळ जात नाहीं. तुकुमराइ ही रानतुळशीच्या बियांपेक्षां अधिक थंड आहे. सबजा—पाककाळीं स्वादु, प्रमेहनाशक, अग्निमांद्यकर व पित्तनाशक आहे. ( १ ) सर्पाच्या विषावर-सबजाचे पाल्याचा रस घटकेघटकेच्या अवकाशानें दोन तीन वेळ पाजावा. ( २ ) दाहावर–सबजाचें बीं भिजूं घालून तें फुगलें म्हणजे त्यांत गाईचें दूध व खडीसाखर घालून द्यावें. ( ३ ) खवड्यावर–सबज्याचे पाल्याचा रस व निंबाचा रस हे एकत्र करून डोकीस लावावे. ( ४ ) विंचवाचे दंशावर–सबजाचे पाल्याचा रस लावावा. ( ५ ) बाधिर्यावर व कान फुटल्यास–सबजाचा पाला हातावर चोळून रस कानांत घालावा. दिवस ३. ( ६ ) पीनस रोगावर—सबजाचा रस एक तोळा व कापूर एक मासा एकत्र घोटून प्रत्येक दिवशीं सकाळीं व संध्याकाळीं याचे पांच पांच थेंब टाकावे; म्हणजे जळमटें, रक्त, घाण हीं जाऊन पीनस बरा होतो. ( ७ ) कृमींवर —सबजाचा रस द्यावा; अथवा सबजाचा रस व पुदिन्याचा रस एकत्र करून द्यावा. ( ८ ) क्षतांतील कृमि मरण्यास—सबजाचा व धोत्र्याच्या पानांचा रस क्षतावर पिळावा. ( ९ ) आगंतुक गर्मीवर—तुकुमराई थंड पाण्यांत रात्रौ तोळापर्यंत भिजूं घालून ठेवावी. सकाळीं ५।६ तोळे दूध व थोडी साखर घालून प्रातःकाळीं याप्रमाणें सात दिवस द्यावें. ( १० ) पोटदुखीवर- सबजाचा रस साखरेबरोबर द्यावा.

( ११ ) बैल किंवा रेडे रक्त मुततात त्यावर— तुकुमराई तोळे २ व इसबगोल तोळे २ हीं रात्रौ भिजत घालून सकाळीं त्यांतच आणखी अच्छेरपर्यंत थंड पाणी घालून कोळून सरबत करावें. व त्यांत जिरें अर्ध तोळा घालून तें पाजावें. हें नित्य सकाळीं याप्रमाणें ५ दिवस द्यावें. ( १२ ) अग्निदग्ध व्रणावर —सबजाचे पाल्याचा रस लावावा.

## २२ सहदेवी. ( सं. )

( गु.-शेदरडी. लॅ-Vernonia cainerla वरनोनिया साइनेरिया. )

सहदेवीला ओसाडी असेंही म्हणतात. सहदेवीचीं झाडें पर्जन्यकाळीं सर्व स्थळीं उत्पन्न होतात. या झाडांची उंची दोन हातपर्यंत असते. सहदेवीचीं पानें हिरव्या रंगाचीं असून तीं लांबट व सुमारें दोन अंगुळें रुंदीचीं असतात. या झाडावर लहान लहान आबाशाई रंगाचीं फुलें येतात. पडक्या इमारतीवर हीं झाडें फार येतात. पांढऱ्या फुलाचीही यांत एक जात आहे. रानांत हीं झाडें पुष्कळ उगवतात. या झाडाच्या पानांस व फळांस दर्पयुक्त वास येतो. सहदेवी ज्वरपरिहारक आहे. "पीतपुष्पा" "महाबला" अशींही इचीं नांवें आहेत. हिचे गुण चिकण्याप्रमाणेंच आहेत. ( १ ) विषमज्वरावर—रविवारीं प्रातःकाळीं स्नान करून झाडावर आपली छाया पडूं न देतां पूर्वाभिमुख उभें राहून सहदेवीची मुळी खणून काढावी. ती काळ्या सुतानें रोग्याचे दंडांत किंवा गळ्यांत बांधावी. ( २ ) अंग येतें त्यावर—सहदेवीच्या पाल्याचा रस त्याजवर पिळून अंग आंत घालवावें, म्हणजे पुनः येत नाहीं. ( ३ ) मुखरोगावर -सहदेवीच्या मुळांचा काढा करून त्याच्या गुळण्या कराव्या. ( ४ ) घाम काढण्यास —सहदेवीच्या मुळांचा काढा करून द्यावा. ( ५ ) गंडमाळेवर —सहदेवीचें मूळ पुष्यनक्षत्रीं हातांत बांधावें. ( ७ ) तापावर—मुळ्यांची टोपी करून डोक्यास घालावी; किंवा रस द्यावा; म्हणजे ताप उतरतो. ( ८ ) सिध्मकुष्ठावर—आबाशाई रंगाच्या फुलाच्या सहदेवीचा रस लावावा. ( ९ ) निद्रा येण्यास -मुळी डोक्यास बांधावी.

## २३ सर्पाक्षी (सं.)

( गु. नोळवेल्य. हिं. नाकुली. का. विषमुंगरी. ल. Rowolfia रोवोल्फिया )

हीस ‘ थोर मुंगुसवेल ’ असें म्हणतात. हिच्या मुळांस ‘राखा’ म्हणतात. सर्पाक्षी ही तिखट, कडू, उष्ण आहे. व व्रण, कृमि व सर्पादिकांचीं विषें यांचा नाश करणारी आहे. (१) सर्प, आंगें, फुरसें, उंदीर व विंचू यांच्या विषावर—सर्पाक्षीचा रस पाजावा. (२) हरतालाचे विषावर—सर्पाक्षीचा रस साखरेंत द्यावा. (३) विषमज्वरावर चंद्रग्रहणाच्या वेळीं सर्पाक्षीला आंतून तिची मुळी काळ्या सुतानें डाव्या कानाला बांधावी म्हणजे एकाहिक ज्वर जातो. द्व्याहिक ज्वर असला तर उजव्या कानाला बांधावी. अथवा स्मशानामध्यें रुजलेल्या सर्पाक्षीचीं मुळी आदितवारीं घ्यावी आणि तुपाशीं उगाळून तिचा ललाटावर तिलक करावा, म्हणजे एकाहिक ज्वर जातो.

## २४ साखरनिंबू. ( सं. मधुरजंबीर )

ही एक निंबाचीच जात आहे. परंतु याचें फळ आंबट निंबापेक्षां बरेंच मोठें असतें. हें फळ नारिंगाएवढें असतें. याची रुचि गोड असते. हें झाड बरेंच उंच वाढून याचा विस्तारही मोठा वाढतो. या झाडावर कांटे असतात. पक्क फळाचा रंग तांबूस असतो. तापकऱ्यास हें फळ फार आवडतें. साखरनिंबू--स्वादु, मधुर, तर्पण, गुरु, शीत, वृष्य, पुष्टिकारक, ग्राहक, धातुवर्धक; व वायु, पित्त, कफ, शोष, विषदोष, श्रम, विषरोग, अरुचि, छर्दि, रक्तरोग यांचा नाश करितें. (१) ओकारीवर—वाळलेल्या साखरनिंबाची राख मधांत द्यावी.

## २५ सापसंद.

सापसंदीच्या वेली असतात. हींत काळी, व पांढरी अशा दोन जाती आहेत. हिचीं पानें कांहींशीं नागवेलीसारखीं व डेंखाजवळ रुंदट असतात. काळी सापसंद गुणांनीं अधिक आहे. सापसंद फार कडू आहे सापसंदीची पूड सर्पाच्या मुखांत टाकली तर तो हतवीर्य होतो. [१] सर्पाच्या विषावर—काळ्या सापसंदीचें मूळ व रिठा किंवा पांढऱ्या

गुंजेचें मूळ थंड पाण्यांत उगाळून तें पाणी थोडथोडक्या अवकाशानें द्यावें. किंवा नुसतें सापसंदीचें मूळ उगाळून द्यावें. ( २ ) सर्व प्रकारच्या विषारांवर—काळ्या सापसंदीचें मूळ पाण्यांत उगाळून त्यांत मिरें वाटून पोटांत द्यावें. पथ्य तूपभात. ( ३ ) पटकी व पोटदुखी यांजवर—सापसंदीचें मूळ थंड पाण्यांत उगाळून द्यावें. ( ४ ) मुलाच्या कृमिरोगावर—सापसंदीचें मूळ दुधांत उगाळून देत जावें. अथवा नित्य बाळगुटींत उगाळीत जावें, ह्मणजे कृमिविकार होणार नाहीं.

## २६. सालई ( सं. शल्लकी, शालवृक्ष. )

या झाडास "सारफळ" असेंही म्हणतात. सालईचा वृक्ष मोठा होतो. हीं झाडें बहुतकरून डोंगराळ प्रदेशांत फार होतात. याचीं पानें आगस्त्याच्या पानांसारखीं बारीक असतात. यास तिकोनी व चिंचोक्यासारखीं फळें येतात. या फळांचें लोणचें चांगलें होतें. सालईचें लाकूड इमारतीस उपयोगीं पडत नाहीं. या झाडास गुग्गुळासारखा पांढरा चीक येतो. हा गुग्गुळासारखा धूप आहे. यास " कुंदुस " म्हणतात. हीं झाडें खानदेशांत रांजणघांटावर फार आहेत. या झाडांचा रंग हिरवट दिसतो. याच्या लाकडाचे चाटू, पाळीं वगैरे करितात. सालई—पुष्टिकारक, तुरट, शीतवीर्य, मधुर, कडू, ग्राही; व रक्तदोष, व्रण, कफ, वायु, पित्त, अर्श, पक्वातिसार, कुष्ठ, रक्तपित्त यांचा नाश करिते. हिचीं फुलें—कफ, वायु, अर्श, कुष्ठ, अरुचि, यांचीं नाशक आहेत. सालईचा डीक—मधुर, तीक्ष्ण, कडू, रुचिकर, तिखट, स्निग्ध, त्वचेला हितावह, उष्ण; व ज्वर, घाम, कफ, रक्तविकार, प्रदर, वायु, अलक्ष्मी, पीडा, ग्रहबाधा, रक्तातिसार, यांचा नाश करितो. ( १ ) डोळे येतात त्यास व डोळ्याची आग शांत होण्यास—सालईचा पाला वाटून रात्रीस डोळ्यांवर पेंड बांधावा. ( २ ) संधिवातादिकांवर—सालईचा पाला वाटून त्यांचा पेंड बांधावा. ( ३ ) प्रदर व रक्तातिसारावर—सालईचा डीक रात्रीं पाण्यांत भिजूं घालून सकाळीं कोलून त्यांत खडीसाखर घालून तें प्यावें. ( ४ ) रक्तातिसारावर—सालईची साल दुधांत वाटून मध घालून द्यावी.

## २७. सांवा.

( सं.–शामक. गु.–शामो, शामा. हिं–सांवा. ते.—श्यामालु. फा.–शामाख्.
लॅ—Penicum fumentaceum पॅनिकम् फुमेन्टेकम्. )

सांवा हें धान्य बहुतेक ठिकाणीं होतें. याचें रोप गुडघ्याइतकें किंवा मांडीइतकें वाढतें. सांवा हें धान्य अगदीं वरीप्रमाणें दिसतें. परंतु हें वरीपेक्षां किंचित् मोठें असतें. सांवा कोंकणांत होत नाहीं. सांव्यांत काळा व पांढरा अशा दोन जाती आहेत. साव्याच्या तांदुळाचा भात गरीबगुरिबांस खाण्यास उपयोगीं पडतो. याचा उपयोग बहुतकरून हलक्या प्रतीच्या लोकांत होतो. दुखणेकऱ्यांस याच्या तांदुळांचा भात खावयास देतात; **सांवा**—मधुर, शीतल, तुरट, शोषक, लघु, रूक्ष, वातकारक, ग्राहक; व रक्तपित्त, कफ, विषदोष यांचा नाश करितो. ( १ ) **अन्नद्रवशूलावर**–सांवे अथवा कोद्रु [ कोद्रव ] किंवा कांग [ प्रियंगु ] यांचे तांदूळ घालून केलेली क्षीर अन्नद्रवशूलावर हितकारक आहे.

## २८. सुग्रिणी.

यास " थोरला मालेबंद " असेंही ह्मणतात. याचीं पानें कुड्याच्या पानासारखीं असून तीं जाड असतात. हीं पानें फार चिकट असतात. सुग्रिणीस बाभळीच्या फुलासारखीं पिवळ्या रंगाचीं फुलें असतात. हें झाड मोठें होतें. याची साल पांढऱ्या रंगाची असते. परंतु ती वाळल्यावर काळसर रंगाची होते. हिच्या सालीच्या चूर्णाच्या गोंदासारख्या चिकट गोळ्या होतात. ( १ ) **पैणीस**–सुग्रिणीच्या पाल्याच्या रसांत जिरें व साखर घालून द्यावी व तोच चोथा वर चोळावा. दि० ७. पथ्य अळणी. अथवा सुग्रिणीची साल उगाळून वर लावावी. ( २ ) **देवी हलक्या येण्यास**–सुग्रिणीची साल ताइतांत भरून तो ताईत गळ्यांत बांधावा. ( ३ ) **अस्थिभंगावर**–या झाडाची साल आणून बारीक कुटावी, अथवा त्यांतच चतुर्थांश नाचण्याचें पीठ घालून थोडें पाणी छाटून वाफ द्यावी व त्या मिश्रणाचा, हाड दुखावलें असेल किंवा मोडलें असेल त्या जागीं दीड अंगूळ जाडीचा लेप देऊन त्याजवर गोणपाटाचा तुकडा बसवून वरून

घट्ट कापड बांधावें. आणि सात दिवस गेल्यानंतर एक वेळ सोडून पाहून व्यथित जागीं औषधाचा लेप कमी झाला असल्यास पुनः देऊन पूर्ववत् घट्ट भाळी ( हात न हालेल अशा प्रकारचा पट्टा ) बांधून ठेवावी. या योगानें कोणत्याही प्रकारचा अस्थिभंग झाला असतां त्वरित गुण येतो. ( ४ ) मांड होते त्यास–सुभ्रिंगीची साल उगाळून लेप द्यावा.

२९. सुरपीण. ( सं. सुरपर्णिका. )

ही एक शेवतीची जात आहे. हिचीं पानें शेवतीच्या पानांसारखीं कात्रेदार असतात. पान शेवतीहून लहान असतें. हें झाड दोन हात उंच वाढतें. हीस पांढरीं अगर पिंवळीं अशीं फुलें येतात. सुरपिणीचा स्वाद कडू व तिखट असून ही पाचकही आहे. ( १ ) कान फुटल्यास —सुरपिणीच्या पाल्याचा रस कानांत घालावा, म्हणजे तिडकाहि बंद होतील. ( २ ) मुलाचे हगवणीस--सुरपिणीचें पाळ गाईच्या निरशा दुधांत उगाळून द्यावें. ( ३ ) मुलांचा खोकला, पडसें व कृमिरोग यांवर--सुरपिणीचें पाळ उगाळून मधाशीं द्यावें, अथवा पानांचा रस मधाशीं द्यावा ( ४ ) दम्यावर–सुरपिणीच्या पाळांचा, फुलांचा किंवा पानांचा रस द्यावा. ( ५ ) नळविकारावर- सुरपिणीच्या ओल्या पानांचा रस १ तोळा काढून त्यांत थोडी मिरपूड घालून द्यावा.

३०. सुरबंद ( सं. मंचपत्री. )

हें झाड सुमारें हात दीड हात उंच वाढतें. ओलसर जमिनीत हीं झाडें पुष्कळ होतात. याचीं पानें शेवतीच्या पानासारखीं परंतु त्यांहून लहान व अरुंद असतात. या पानांस पुष्कळ खांचे असतात. या पानांस दर्पट वास येतो. हीं पानें फारच कडू असतात. या झाडास कोथिंबिरीच्या झाडाप्रमाणें फुलांचे घोंस येतात; त्यांचा रंग गुलाबी असतो. हीं फुलें कडवट असतात. हें झाड किरमाणी ओंव्याच्या जातीचें आहे. याच्या फुलांचा उपयोग किरमाणी ओंव्याप्रमाणें होतो. यास साष्टी प्रांतांत “ मारबेटी ” असें म्हणतात. सुरबंद—कडू, पित्तल, उष्ण, विषनाशक; व कफ, वायु, ज्वर, खोकला, कृमि, दुर्गंध यांचा नाश करितो.

( १ ) मुलांचा जंतविकार, पोटफुगी, पोटदुखी यांवर—सुरबंदीच्या पानांचा रस काढून द्यावा. ( २ ) अजीर्ण व पोटदुखी यांवर—सुरबंदीच्या पानांचा रस द्यावा. ( ३ ) पिसवा नाहींशा होण्यास—सुरबंदीचीं झाडें आणून ठेवावीं. म्हणजे त्यांच्या उग्रट वासानें पिस्वा नाहींशा होतात.

## ३१ सुरू [ सं. सरल. ]

हा वृक्ष सुरेख दिसतो. हा सरळ व उंच वाढतो. याच्या फांद्या बारीक व आंखूड असतात. हा निरंतर हिरवागार असतो. या देशांत शोभेसाठीं हे वृक्ष बागांत लावितात. या वृक्षाचें लांकूड फार बळकट व टिकाऊ असतें. या झाडापासून जो चीक निघतो, त्यास ‘ बिरोजा ’ असें म्हणतात. तो तंतुवाद्यांच्या तारांस लावावयासाठीं उपयोगीं पडतो. हा चीक अग्नीवर टाकला असतां त्यास धूपासारखा वास येतो. सुरूचें झाड—मधुर, कडू, रसकाळीं व पाककाळीं तिखट, लघु, स्निग्ध, उष्ण; आणि कर्णरोग, नेत्ररोग, कंठरोग, कफ, वायु, उवा, खोकला, घाम, व्रण, राक्षसबाधा, अलक्ष्मी यांचा नाश करितें. ( १ ) गेलेले केश येण्यास—सुरूचा पाला पाण्यांत वाटून त्याचा लेप करावा.

## ३२ सोनचांफा.

[ सं. सुवर्णचंपक, हेमपुष्प. गु—पीलो चंपो. ]

हा वृक्ष फार मोठा होतो. तो लाविल्यानंतर आठदहा वर्षांनीं वर्षांतून दोनदां उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत फुलतो. हीं फुलें दिसण्यांत फार सुंदर असतात. या फुलांचा वास फार उग्रट असल्यामुळें तो हवेंत चहूंकडे फांकून जातो. आणि जी हवा विकारी असेल तींत तो मिसळून ती हवा चांगली करितो. याचें लांकूड फार कणखर असतें. सोनचांफा—कडू, तिखट, शीतल, तुरट, मधुर, वृष्य, हृद्य, सुगंधि, भ्रमरांचा नाश करणारा; आणि दाह, पित्त, कफ, रक्तदोष, मूत्रकृच्छ्र, वात, कुष्ठ, विष, कृमि, कंडु, व्रण यांचा नाश करितो. ( १ ) धुपणीवर—सोनचांफ्याच्या सालीचा रस द्यावा अथवा सालीचा काढा करून तो द्यावा. ( २ )

**मुलांचे ससणीवर**–विड्याचे रसांत सोनचांफ्याचे फुलांतली कळी शुद्ध केलेला सज्जीखार घालून पाजावी. (३) **विषमज्वरावर**–सोनचांफ्याच्या मुळांचा काढा द्यावा.

### ३३. सोनवेल. (सं. स्वर्णवल्ली.)

हीस आकाशवेल असेंही म्हणतात. सोनवेल ही दाभणाएवढी जाड असून ही वृक्षावर पसरते. हिचें मूळ वृक्षावरच असून तें मूळ कोठें आहे हें कांहीं समजण्यांत येत नाहीं. या वेलीचे सोन्यासारखे पिवळ्या रंगाचे बारीक दोर असतात. देशावर ही वेल बहुतकरून शेराच्या झाडावर असते. सोनवेल–स्तन्यकारक (स्त्रियांस दूध उत्पन्न करणारी), मस्तकशूल व त्रिदोष यांचा नाश करिते. (१) **ज्वरावर**–सोनवेलीचा रस काढून मध घालून द्यावा. (२) **मुलांच्या ससणीवर**–सोनवेलीचा रस मधांत द्यावा.

### ३४. सोनारवेल.

या वेलीचीं पानें पिंपळाच्या पानांसारखीं असतात. या पानांची रुंदी एक वीत व लांबी सव्वा वीत असते. या वेलीची जाडी करांगुळीएवढी असते. हिचा रंग पांढरवटही असतो. प्रथम हिच्या पानांचा रंग तांबूस असून नंतर हिरवट होतो. हीं पानें जून झाल्यावर त्यांवर तांबड्या रंगाचे चट्टे होतात. (१) **पटकीवर व सर्पादिकांचे विषावर**—सोनारवेलीच्या पानांचा रस द्यावा. किंवा मुळी पाण्यांत उगाळून किंवा चावून खाण्यास द्यावी. (२) **गर्मीचा आजार अंगांत भिनल्यानें अंगावर चट्टे होतात त्यास**–सोनारवेलीचें मूळ सुकवून नित्य गाईचें निरसें दूध ५ तोळे घेऊन त्यांत गंधाप्रमाणें तें मूळ उगाळून, तें गंध सुमारें ६ मासे पर्यंत त्या दुधांत कालवून, त्यांत खडीसाखरेची पूड १ तोळा व जिऱ्यांची पूड दोन गुंजा घालून, प्रत्यहीं एक वेळ याप्रमाणें सेवन केल्यानें कोणत्याही प्रकारची अंगांत मुरलेली गर्मी झडून जाऊन प्रकृति निर्दोष सुधारते. हें औषध फारच उत्तम आहे. पथ्य करावें.

5075
२११२७/6339

## ३५ हरभरा.

( सं. हरिमंथः; चणकः, गु. चणा, चण्या. हिं. चना. अ.-हुमस्. इं-gram ग्राम, लॅ.-cicer arientinum सीसर एरिएंटिनम्. )

अदल धान्य आणि द्विदल धान्य असे धान्यांत दोन प्रकार आहेत. जसा अदल धान्यांत गहूं हा मुख्य आहे, तसा द्विदल धान्यांत हरभरा मुख्य आहे. हरभऱ्याची उत्पत्ति बहुधा या खंडांतच आहे. हरभरा आश्विन महिन्यांत पेरितात, व माघअखेर व फाल्गुनांत तो तयार होतो. हरभऱ्याच्या झाडाची उंची दीड दोन विती असते. हरभऱ्याच्या झाडास पांच पन्नास घांटे येतात, त्यांत एक अगर दोन दाणे असतात. गुजराथ, दक्षिण, सिंध, काबूल, अरबस्तान येथें हरभरा पुष्कळ पिकतो. ओल्या हरभऱ्याचे टाहाळे सोलून खातात; व त्यांतील दाणा सुकला म्हणजे ते भाजून खातात. त्यास हुळा असें म्हणतात. गव्हाप्रमाणेंच हरभऱ्याचेही पुष्कळ पदार्थ होतात. हरभऱ्याच्या दाळीपासून बुंदी, मोतीचूर, पोळ्यांतील पुरण, झुणका, बेसनाचे लाडू, मेसूर अशीं अनेक तऱ्हेचीं पक्वान्नें होतात. हरभरे भाजून त्याचे फुटाणे करितात; त्यांचा तर नित्य खप होतो. फुटाणे सोलले म्हणजे त्यांस डाळें असें म्हणतात. हें डाळें गव्हांपेक्षांही अधिक पौष्टिक आहे. याचेही लाडू करितात. फुटाणे शरीरास फारच हितावह आहेत. हे पौष्टिक असून क्षुधेला फारच उत्तम आहेत. प्रवासांत हे फारच उपयोगी आहेत. हे खाऊन मार्गक्रमण करीत असतां जर पाणी मिळालें नाहीं, तरी यांच्या योगानें तहान लवकर लागत नाहीं. दर शुक्रवारीं फुटाणे अवश्य खावे, असा जो नियम आहे, तो याच्या अतिशय उपयुक्ततेवरूनच असावा असें वाटतें. हरभऱ्याची वाटलेली डाळही फारच पौष्टिक आहे. हरभऱ्याच्या झाडावरील आंब काढतात. ती फारच उपयोगी आहे. कोंवळ्या झाडाच्या पाल्याची भाजी करितात. हरभऱ्याच्या आंबींत भिजवून जें बीं पेरावें, तें फार लवकर उगवून येतें. **हरभरे** वातुल, शीत, लघु, रूक्ष, तुरट, विष्टंभकारक, मधुर, रुचिकर, वर्णकारक, ज्वरनाशक, आध्मानकारक; व रक्तपित्त, कफ, रक्तदोष व पित्त यांचा नाश करितात. **भाजलेले हरभरे**—

5075



( फुटाणे )-उष्ण, रुचिकर, रक्तकोपन, लघु, बलकर, शुक्रल, शरीराला तेज देणारे; व स्वेद, शैत्य, आम, कफ, वायु, क्लम, यांचा नाश करितात. हरबऱ्यांची आंब—अग्निदीपक, रुच्य, खारट, अति आंबट व दांतांना आंबविणारी अशी असून शूल, अजीर्ण, अग्निमांद्य यांचा नाश करिते. ( १ ) कामीण रोगावर—हरभऱ्याच्या डाळीचें, बरोबरीनें गूळ घातलेलें नुसतें पुरण ३ दिवस खावें. तृषा लागल्यास पुरणाचें कट काढून ठेवावें, व तें प्यावें. ( २ ) मस्तकवायूवर -अर्धा शेर हरभऱ्याचें पीठ व तितकीच मोहऱ्यांची पूड आंबींत घालून मस्तकावर लेप द्यावा. ( ३ ) घाम बंद होण्यास—भाजलेले हरभरे, ओंवा व वेखंड यांचें चूर्ण अंगास चोळावें. ( ४ ) पडशास-रात्रीस निजते वेळीं ताजे फुटाणे खावे व वर पाणी पिऊं नये ( ५ ) धातुपुष्टतेस-डाळें व साखर पैसाभार हीं रात्रीं निजतेसमयीं खावीं. वर पाणी पिऊं नये. असें एक महिन्यापर्यंत खावें. ( ६ ) पोटदुखी व पटकीवर—हरभऱ्याची आंब, १।२ तोळे द्यावी. ( ७ ) पानथरीवर-हरभऱ्याची आंब, शेंदेलोण व बांगडखार हे एकत्र करून द्यावे; अथवा भाजलेला हिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, कोळिंजन, जव. खार, शेंधेलोण यांचें ३ मासे चूर्ण, हरभऱ्याच्या २ तोळे आंबशीं द्यावें.

## ३६ हरीक.

( सं. कोद्रुः, गु. कोदरो. हिं. कोद्रू. आ. कोद्रू. इं. Puncture l paspel um पंक्चर्ड पास्पेलम. लॅ.– Paspalum scrobicutalium पास्पेलम् स्क्रोबिक्युटोलियम )

सर्व धान्यांत हें अगदीं हलक्या प्रतीचें धान्य आहे. गरीबांवांचून हें धान्य बहुधा कोणीं खात नाहीं. यांत चार जाती आहेत. रामेश्वरी, शिवेश्वरी. हरकिणी व माजरा. माजरा ही जात फारच अपायकारक आहे. खाण्याच्या उपयोगांत आणावयाच्या पूर्वीं, माजऱ्या हरिकाची जी कृति करावयाची ती न करितां जर तो खाल्ला, तर त्यापासून मोठा अपकार होऊन वांति, जुलाब असे विकार होतात. घेरी येते, मन भ्रमिष्ट होतें, ग्लानि येऊन कैफ चढतो, व समयविशेषीं खाणारा प्राणासही मुकला

जातो. असे अनेक अनर्थ घडतात. खाण्याच्या उपयोगासाठीं अशा रीतीनें तयार करितात कीं, तो माजरा हरीक, एक दिवस शेणपाण्यांत भिजत घालून ठेवतात. मग तो स्वच्छ धुवून एक दोन दिवस उन्हामध्यें वाळवितात. असें केल्यानें त्याचा दोष जाऊन तो खाण्यास योग्य होतो. हरिकाचा भात होतो, पेज होते, वडे करितात. हरिकाची लोंबी कांहींशीं नाचण्यासारखी आहे. हरीक मोठ्या राईएवढा असून त्याचा रंग पिवळट असतो. हरीक फार शीतळ आहे. हा अशक्तानें कधींही खाऊं नये. हरीक—मधुर, शीत, ग्राहक, गुरु, कडू, व्रणाला हितकर, रूक्ष; व कफ, पित्त, विष, मूत्रकृच्छ्र, यांचा नाश करितो. (१) **अन्नद्रवशूलावर**—हरिकाचे तांदुळाची खीर खावी किंवा हरिकाचा भात दह्याबरोबर खावा.

## ३७. हंसपदी.

(सं.- हंसपादी; शीतांग. गु. हंसराज. हिं. हंसपगी. ते. हंसपादमु. इं.-Maiden hair, मेडन हेर. लॅ.-Adiantum lunulatum एडिएंटम् ल्युन्युलेटम्.)

हीस "हंसपदी, कीटमाता, त्रिपादिका" अशीं नांवें आहेत. रक्तलाजाळूच्या झाडास हंसपदी असें म्हणतात. हंसपदी ही गुरु, थंड आहे व रक्तदोष, विष, विसर्प, व्रण, दाह, अतिसार, लूता, भूतबाधा, यांचा नाश करिते. (१) **विंचवाच्या विषावर**—हंसपदीचें मूळ रविवारीं प्रातःकाळीं काढून तें तोंडांत धरावें आणि कानांत फुंकावें.

## ३८. हळद.

(सं.-हरिद्रा, रजनी. गु. हळदर. हिं. हळदी. आ. उरुकुस्कुकर. ते. पासुप. इं. Turmeric टर्मेरिक्. लॅ. Curcumalonga करक्युमालोंगा.)

हळदीचें झाड कंबरेइतकें वाढतें. तें कर्दळीच्या झाडासारखें असतें. याचीं पानें कर्दळीसारखीं व तेवढींच रुंद असतात. जमिनींत आल्याप्रमाणें हळदीचे कंद असतात. ती आल्याप्रमाणेंच लावतात व आल्याप्रमाणेंच वाढत जाते. हळदीच्या कुड्याच्या आंतून पिवळा रंग असतो. पानास हळदीप्रमाणेंच वास येतो. हळदीचा उपयोग फार होतो. स्वयंपाकांत भाज्यांस व दुसऱ्या पुष्कळ पदार्थांस हळद घालावी लागते. हळ-

दीच्या योगानें पदार्थास चांगला रंग व रुचि येते. हळदीच्या अंगीं रक्त शुद्ध करण्याचा गुण आहे. पडून अथवा दुसऱ्या रीतीनें शरीराच्या दुखावलेल्या भागावर हळद उगाळून घालतात. हळदीचे गंध लावण्याचे रवे करितात व त्यांपासून कुंकूं होतें. असे अनेक उपयोग होतात. **हळद**–तिखट, कडू, देहाचा वर्ण करणारी, उष्ण, रूक्ष, शोधन, स्त्रियांचें भूषण; व कफ, वायु, रक्तदोष, कुष्ठ, कंडू, प्रमेह, त्वग्दोष, व्रण, सूज, पांडु, कृमि, विष, पीनस, अरुचि, पित्त, अरुची यांचा नाश करिते. **कापूर-हळद**–शीतल, वातकारक, कडू, स्वादु, मधुर, वृष्य, पित्तनाशक व सर्व प्रकारचे कंडु यांचा नाश करिते. **रानहळद**–तिखट, मधुर, रुचिकर, अग्निदीपक, कडू; व कुष्ठ, वायु, त्रिदोष, रक्तदोष, विष, श्वास, कास, उचकी, यांचा नाश करिते. (१) **खोकल्यावर**--निजते वेळीं हळद भाजून ती चावून खावी. (२) **श्लीपद** (पाय किंवा हात मोठे होणें) **रोगावर**–हळदीचें चूर्ण व गूळ गोमूत्रांत कालवून प्यावें, म्हणजे एक वर्षाचें श्लीपद असलें तरी दूर होऊन खरूज, कुष्ठ हीं नाहींशीं होतात. (३) **मूळव्याधीवर**–हळकुंड तुरीच्या डाळींत शिजवून छायाशुष्क करावें, व गाईच्या दुधांत उगाळून मोडांस लेप द्यावा; म्हणजे मोड नरम पडून कातरे भरतात व ठणका सावडतोब राहतात. (४) **अहिऱ्यावर व सर्व नेत्ररोगांवर**–हळकुंड तुरीच्या डाळींत शिजवून छायाशुष्क करावें. व पाण्यांत उगाळून दिवसांतून दोन वेळ सूर्यास्तापूर्वीं अंजन करावें; म्हणजे अहिरा, पांढरीं फुलें व लाली यांचा हटकून नाश होतो. (५) **स्तनरोगावर**–हळद व लोध्र यांचा पाण्याशीं लेप द्यावा. अथवा हळद आणि कुवारकांड्याचें मूळ पाण्यांत उगाळून लेप द्यावा. (६) **डोळ्याचें अंग लाल होऊन तिडका लागत असल्यास त्यावर**–हळद, तुरटी व चिंचेचा पाला समभाग वाटून त्याची पुरचुंडी करावी, व ऊन करून तिनें डोळे शेकावे. नंतर डोळ्यांभोंवतीं हळद व तुरटीचा लेप करावा. (७) **मूळव्याधीवर** हळद भाजून तिची पूड कोरफडीच्या गिरांत मिळवून द्यावी. दिवस ७. (८) **मुलांच्या ससणीवर**–गोमूत्र एक दोन वेळां गाळून त्यांत हळद

घालून तें पाजावें. (९) पडशावर व खोकल्यावर—तापलेल्या दुधांत हळदीचें चूर्ण घालून तें प्यावें. (१०) ससणी (सुसें) रोगावर—हळद व गोरोचन विड्याच्या पानाच्या रसांत द्यावें. (११) स्वरभेदावर—रात्रीं कढत दूध चिमटीभर हळद टाकून प्यावें. (१२) पिष्टमेहावर—हळद व दारूहळद यांचा काढा द्यावा. (१३) मूर्च्छेवर—हळद व साखर पाण्यांत द्यावी (१४) मूत पडच्यावर—तुषोदकांत (पेजेंत अथवा कांजींत) हळद व गूळ घालून द्यावें. (१५) कफरोगावर—गोमूत्रांत हळद घालून द्यावें. (१६) सारा, खुपऱ्या वगैरे नेत्ररोगांवर—शेळीच्या लोण्यांत हळकुंड उगाळून एका काडीच्या अग्रास तें उडदाइतकें लावून नाकाजवळील डोळ्याचे कोनांत घालावें. (१७) लहान मुलांस काटे येतात त्यास—कौलाचे तुकड्यावर थंड पाण्यांत हळकुंड उगाळून, त्यांत लोणी मिसळावें व तें मिश्रण दोन्ही खवाक्ष्यांवर, व मानेच्या खालीं, पाठीच्या कण्यावर व दोन्ही कानांपुढें गालफडांवर लावून चोळलें असतां काटे बाहेर येतात व विकार कमी होतो. याप्रमाणें ३ दिवस चोळावें. (१८) विंचवाचे विषावर—हळदीची पूड निखाऱ्यावर घालून दंशस्थानीं धुरी द्यावी व चिलमींत घालून तंबाखूप्रमाणें ओढावी (१९) दुर्बल ज्वरावर—हळद, हरीतकी व जवखार यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. (२०) काविळीवर—हळदीचें चूर्ण १ तोळा व दहीं ४ तोळे हीं प्रातःकाळीं सेवन करावीं. (२१) परसाकडेस खडा धरला तर—शेळीच्या मूत्रांत हळद घालून द्यावी. (२२) नारूवर—पुरुषाच्या मूत्रांत हळद वाटून लेप द्यावा.

## ३९. हाडसंधी.

(सं.—अस्थिसंधिनी. गु. हाडसांखळ. हिं. हारसिंगार; हडसंगरी.)

हाडसंधीस "ग्रंथिमान्, अस्थिसंहारी, वज्रांगी, अस्थिशृंखकलिका, अस्थिसंहारक, अस्थिसंधानजननी, अस्थिसंधि, वज्रवल्लरी," अशीं संस्कृत भाषेंत नांवें आहेत. त्रिधारी कांडवेलीस हाडसंधी असें म्हणतात. या वेलीचा विस्तार मोठा होतो. चौधारी कांडवेलीपेक्षां हिच्या वेलाची जाडी

मोठी असते. या वेलीचा फांटा कुंडींत घालून तो वेल एखाद्या झाडावर चढवावा; म्हणजे त्याचा विस्तार पुष्कळ होतो. ठाण्यास ही वेल बऱ्याच ठिकाणीं लावलेली आहे. अशा विलक्षण प्रभावाच्या वल्ली लावण्याची हौस पूर्वीच्या लोकांस फार होती. **हाडसंधी**–ही भग्नसंधानकर, उष्ण, वातहर, कफनाशक, कृमिनाशक, रूक्ष, मधुर, लघु, वीर्यवर्धक, पाचक, पित्तकारक; आणि अर्श व नेत्ररोग यांचा नाश करणारी आहे. (१) **अस्थिभंगावर**-हाडसंधी ठेंचून तीन दिवस मोडलेल्या हाडावर बांधावी. त्रिधारी कांडवेल न मिळाल्यास चौधारी कांडवेल घ्यावी. गुरांचें हाड मोडल्यास त्यासही हाच उपाय करावा. (२) **सर्व वातरोगांवर**— हाडसंधीची वरील साल काढून त्याचें चूर्ण करून, सोलीव उडदाच्या डाळीच्या पिठांत कालवून, तिळाच्या तेलांत त्याचे वडे पक करून खावे. म्हणजे वातरोगाचा नाश होतो.

## ४०. हिंग.

(सं. हिंगु. गु. हिंग, वधारणी. हिं हिंग. का. लेसु. आ. हिलतीत. फा. अंगुझ. इं. Assafoetida अस्साफोटिडा. लॅ. Narthex Assafoetida नार्थेक्स् अस्साफोटिडा.)

हिंगाचीं झाडें हिरात, खोरासान व बलक या प्रांतांत होतात. याच्या पानापासून कंदांस (मुळास) चोचे मारून जो चीक निघतो, त्यास हिंग असें म्हणतात. तिकडून हा हिंग पंजाबाकडे व मुंबईस येतो. हिंगाचा या देशांत अतिशय खप होतो. हिंग हा अनेक रोगनाशक आहे. **हिंग**– पित्तल, उष्ण, हृद्य, कडू, सारक, तिखट, लघु, तीक्ष्ण, रुचिकर, पाचक, अग्निदीपक, स्निग्ध, मलस्तंभक; आणि दमा, खोकला, कफ, आनाह, आध्मान, गुल्म, शूल, हृद्रोग, वायु, अजीर्ण, जंतु व उदर यांचा नाश करितो. (१) **अजीर्णावर**-हिंग सुमारें हरभऱ्याएवढा, गोळी करून तुपाशीं खावा. (२) **वायगोळ्यावर**—हिंगाची नुस्ती गोळी करून गिळावी. (३) **जनावराच्या क्षतांत किडे पडतात त्यावर**—क्षतांत हिंग भरावा. (४) **अपस्मारावर**—तूप, सैंधव व हिंग एकेक तोळा

घेऊन बारा तोळे गोमूत्रांत घालून शिजवावें. मूत्र आटलें म्हणजे तूप सिद्ध झालें असें समजावें. तें समप्रकृति पाहून द्यावें. ( ५ ) उचकीवर निर्धूम विस्तवावर हिंग व उडीद यांचें चूर्ण घालून त्याचा धूर प्राशन करावा. ( ६ ) **अफूवर उतार**—हिंग पाण्यांत अथवा ताकांत कालवून तें पाजावें. ( ७ ) **पोटशूळावर**—हिंग मासे ३, कोष्ठ मासे ३, वावडिंग मासे ३, हें सर्व एकत्र करून दोन तोळे गरम पाण्यांत घालून प्यावें. ( ८ ) **पोटशूळावर**- घोड्याच्या अथवा गाढवाच्या लेंड्यांचा रस ६ मासे काढून त्यांत १ मासा हिंग घालून द्यावा. ( ९ ) **चातुर्थिक ज्वरावर**—हिंग व जुनें तूप एकत्र करून ज्वर आला म्हणजे नाकांत घालावें. ( १० ) **खुपऱ्यांवर**—अर्धगुंज हिंग दह्यांत कालवून खुपऱ्यांवर चोळावा. ( ११ ) **हिंगाष्टक चूर्ण, अजीर्णादिकांवर**- सुंठ, मिरें, पिंपळी, ओंवा, सैंधव, जिरें, शहाजिरें व भाजलेला हिंग समभाग घेऊन चूर्ण करावें व तें चतुर्गुणित तुपाशीं अगर भोजनसमयीं तूपभाताशीं द्यावें. म्हणजे अजीर्ण, अग्निमांद्य, मोडशी, पांडु, आम व गुल्म यांचा नाश होतो. ( १२ ) **प्रसूतीच्या मक्कलशूलावर**—हिंग भाजून तुपांत कालवून भक्षणार्थ द्यावा. ( १३ ) **विंचवाच्या विषारावर**--हिंग रुईच्या चिकांत वांटून लेप करावा. ( १४ ) **व्रणसंबंधीं कृमि दूर होण्यास**—हिंग व कडूनिंबाचीं पानें वांटून लेप करावा. ( १५ ) **पटकीवर**—भाजलेला हिंग, कापूर व आंब्याचे कोयींतील मगज समभाग घेऊन पुदिन्याच्या पाल्याच्या रसांत एकत्र खलून गोळ्या बांधून ती १ गोळी एकेक तासाच्या अंतरानें चावून खावी. ( १६ ) **पटकीवर**—हिंग अर्धाभाग, अफू १ भाग, मिरच्यांची वस्त्रगाळ पूड १ भाग व काताची पूड १ भाग; या जिनसा एकत्र करून, त्यांच्या पुदिन्याच्या रसांत वालावालाच्या गोळ्या कराव्या व जुलाब होण्यास आरंभ झाल्यावर प्रत्येक वेळीं अर्धी गोळी द्यावी. (१७) **अर्धशिशीवर**--हिंगाचें पाणी करून नाकांत घालावें. (१८) **कर्णनाद व बहिरेपणा यांवर**—हिंग, चिरफल व सुंठ हीं शिरसेलांत घालून कढवून तें कानांत घालावें. ( १९ ) **नारूवर**—हिंगाचें चूर्ण ४ मासे, पावशेर

दह्यांतून खावें. दिवस ३. (२०) मूत्रकृच्छ्रादि मूत्ररोग व शुक्ररोग यांवर— हिंग व वेलदोडे यांचें चूर्ण ३ गुंजा, दूधतुपाशीं द्यावें. (२१) सर्दीनें कानास दडपे बसल्यास— उत्तम हिंग, कापसांत गुंडाळून कानांत घालून ठेवावा. (२२) परिणामशूलावर— हिंग, सैंधव व जिरें यांचें चूर्ण मधातुपांत द्यावें. (२३) दाढ दुखते त्यास व दंतकृमीवर भाजलेला हिंग दाढेखालीं धरावा. (२४) बचनागाचे विषावर— गाईचे तुपांत ४ गुंजा हिंग द्यावा.

## ४१. हिरडा.

[ सं.-हरीतकी. गु.-हरडे. हिं.-हर्र, हरडा. आ.-एहलीलज फा.-हलीले. इं.-Myrobalans मेरेबॅलन्स. लॅ.—Terminalia chebula टर्मिनोलिया चेबुला. ]

हिरड्याचे वृक्ष कोंकण व गुजराथ या देशांत फार होतात. हे वृक्ष मोठमोठे होतात; याचीं पानें धावड्याच्या पानांसारखीं असतात. याचें लांकूड इमारतकामासही उपयोगीं पडतें. हिरडे रंगास उपयोगीं पडतात. जे हिरडे कोंवळे काढून वाळवितात, त्यांस बाळहिरडे असें म्हणतात. जो हिरडा कठीण, कुऱ्हाडीनें न तुटणारा, जाड, लांबट, टोंकदार, पाण्यांत बुडणारा, आणि दोन किंवा दोहोंहून जास्त तोळे वजनाचा असतो, त्यास सुरवारी हिरडा असें म्हणतात. तो उत्तम गुणकारी आहे. साधारण सुरवारी हिरड्यांस काबुली हिरडे असें म्हणतात. अस्सल सुरवारी हिरड्याच्या जातींचीं झाडें फार थोडीं असतात. मुंबईस कित्येक व्यापारी बनावट सुरवारी हिरडे करून विकतात. हिरडा हा अतिशय उपयोगी आहे, हें पुढील वचनावरून कळून येईल—

“ नास्ति यस्य गृहे माता, तस्य माता हरीतकी. ”

वैद्यशास्त्रांत हिरड्याच्या सात जाती सांगितल्या आहेत विजया, रोहिणी, पूतना, अमृता, अभया, जीवंती आणि चेतकी. जी तुंबडीसारखी गोल असते ती विजया; साधारण गोल असते ती रोहिणी; जिच्यांत मोठी आंठी असून जी पातळ असते ती पूतना; जिची आंठी

बारीक असून जी मांसल असते ती अमृता; जिच्या अंगावर उभ्या पांच रेषा ( कडा, धारा ) असतात ती अभया; जिचा सुवर्णासारखा पिंवळा रंग असतो ती जीवंती; आणि जिच्या अंगावर पांच धारा असतात तिला चेतकी असें म्हणतात. विजया सर्व रोगांवर चांगली आहे; रोहिणी व्रणरोपक आहे; पूतना लेपाच्या कामांत उत्तम आहे; अमृता रेचन देण्यास उत्तम आहे; अभया नेत्ररोगांवर उत्तम आहे; जीवंती सर्व रोगपरिहारक आहे; आणि चेतकी चूर्णाच्या कामीं उत्तम आहे. काळी व पांढरी अशी दोन जातीची चेतकी आहे. पांढरी सहा अंगुळ विस्ताराची असते व काळी एक अंगुळ विस्ताराची असते. कित्येक हिरडे खाल्ल्यानें, कित्येकांचा वास घेतल्यानें, कित्येकांस स्पर्श केल्यानें आणि कित्येकांच्या दर्शनानेंच रेच होतात. मनुष्य, पशु, पक्षी, वगैरे कोणीही प्राणी चेतकीच्या छायेखालीं गेला तर त्यास तत्काळ रेच होण्यास लागतो. चेतकीस जितके वेळ हातांत धरावें, तितके वेळपर्यंत निश्चयानें रेच होतात. राजा, सुकुमार, शक्तिक्षीण व ज्यास औषधापासून अरुचि प्राप्त झाली आहे, त्यास चेतकीचा रेच फार सुखकर व हित करणारा आहे. हिरड्याच्या सात जातींत विजया मुख्य आहे; कारण ती सहज मिळूं शकते. हिरडा हा रूक्ष, उष्ण, अग्निदीपक, बुद्धिवर्धक, मधुर, रसायन, नेत्रांस हितकर, आयुष्यवर्धक, शरीरांतील तत्वांस वृद्धि करणारा, वायूचें अनुलोमन करणारा; आणि श्वास, कास, प्रमेह, अर्श, कुष्ठ, शोथ, कृमि, उदर, स्वरस्तंभ, मलबद्ध, विषमज्वर, गुल्म, आध्मान, तृषा, छर्दि, हिक्का, कंडू, हृद्रोग, कामला, शूळ, प्लीहा, यकृत्, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात यांचा नाश करणारा आहे. हिरड्यांत मधुर, तिखट व कषाय हे रस असल्यामुळें तो पित्तनाश करितो; तिखट, कडू व कषाय रस असल्यामुळें कफनाश, आणि मधुर व अम्लरसाच्या योगानें वायु दूर होतो. हिरड्याच्या मज्जेंत मधुररस, शिरांत अम्लरस, देंठांत तिखट रस, सालींत कडूरस आणि आठींत कषाय ( तुरट ) रस आहे हिरडा चावून खाल्यानें अग्नि प्रदीप्त करितो. चूर्ण करून खाल्ला असतां रेच करणारा होतो.

पक्क करून घेतला असतां मलस्तंभक होतो. आणि शेकून घेतलेला हिरडा त्रिदोषनाशक आहे. भोजनाबरोबर हिरडा खाण्यांत आला तर बुद्धि, बळ व इंद्रियें यांस तेज येतें; वात, पित्त, कफ यांचा नाश होतो; मलशुद्धि होते. जेवणानंतर हिरडे खाल्ले तर वात, पित्त, कफ यांपासून झालेली पीडा दूर होते. हिरडे सैंधवाशीं खाल्ले वर ते कफाचा नाश करितात; साखरेशीं खाल्लयास पित्ताचा नाश करितात. तुपाशीं खाल्लयास वायुरोगाचा नाश करितात; आणि गुळाशीं खाल्लयास सर्व रोगांचा नाश करितात. हिरडे ग्रीष्म ऋतूंत गुळाशीं, वर्षाऋतूंत सैंधवाशीं, शरदऋतूंत साखरेशीं, हेमंतांत सुंठीशीं, शिशिरऋतूंत पिंपळीशीं व वसंतऋतूंत मधाशीं घेतले तर हितकारक होतात. त्रिफळा [हिरडा, बेडहा, आवळकाठी] -दीपन, रुचिकर, चक्षूंना हितावह, रसायन, वयस्थापक, वृष्य, सारक, हृद्य, बळकर; व पित्त, कफ, त्रिदोष, कुष्ठ, मेह, नेत्ररोग, रक्तदोष, मेद, क्लेद, ज्वर, विषमज्वर हे नष्ट करितो. हरीतकीच्या बीचा गीर–नेत्राला हितावह, गुरु, वातनाशक आणि पित्तनाशक आहे. हरीतकीचा निषेध—लंघन केलेला, दुर्बल, श्रमी, कृश, फार तहान लागणारा, गळा धरलेला, हनुस्तंभ झालेला, शोषयुक्त, क्षीण, नवज्वरी, गर्भिणी व रक्त काढलेला यांना हरीतकी देऊं नये. (१) वातरक्तावर—दुरवारी हिरड्याचें अगर बाळहरीतकीचें चूर्ण गुळांत कालवून गोळी करून द्यावी. (२) दमा व उचकी यांवर—हरीतकी व सुंठ यांचा कल्क करून तो ऊन पाण्याशीं प्राशन केला असतां दमा व उचकी हीं शांत होतात. (३) आंवेवर—हिरडा, सुंठ व गूळ समभाग घेऊन त्यांत मावेल तितका निंबाचा रस टाकून गोळी करून खावी; अथवा दोन तीन बाळहरीतक्या नवटांक गाईच्या दुधांत उगाळून प्याव्या. (४) कधीं कोणताही रोग न होण्यास–संध्याकाळीं निजतेवेळीं २ हिरड्यांची पूड खाऊन वर तापलेलें पावशेर दूध प्यावें. हें औषध आठवड्यांतून एकदां तरी घ्यावें. (५) पित्तानें शरीर क्षीण झाल्यास -हिरडेदळ दोन पैसेभार कुटून संध्याकाळच्या गाईच्या ताकांत भिजत घालून ठेवावें. आणि सकाळीं तें ताक

प्यावें. याप्रमाणें तीन चार सप्तकें करावें. रेच झाल्यास उतार तूपभात. (६) अम्लपित्तास—हरीतकी १, मनुका १ व साखर २ भाग यांच्या गोळ्या तोळा प्रमाण करून सांजसकाळ घेत जाव्या. (७) डोळे येतात त्यावर—हिरडा व तुरटी पाण्यांत उगाळून अंजन करावें. (८) पांडुरोगावर—हरीतकीचें चूर्ण ३ मासे, मध एक पैसाभार व तूप २ पैसेभार मिळवून द्यावें; अथवा हरीतकी गोमूत्रांत २१ दिवस भिजत घालून त्यांतून एक एक भक्षण करावी. (९) मुलांस आंकडी होते त्यावर—मोठा हिरडा उगाळून हिरड्यांस लावावा. यानें उपशम न च झाल्यास हिरडा, आवळकाठी व खडीसाखर पाण्यांत उगाळून अंजन करावें. (१०) मूर्च्छेवर—बाळहरीतकीचा काढा तूप घालून द्यावा. (११) पित्तगुल्मावर—हरीतकी व द्राक्षें यांचा काढा गूळ घालून द्यावा. (१३) श्लीपद (पाय किंवा हात मोठे होणें) रोगावर—हरीतकी एरंडेलांत तळून चूर्ण करून तें गोमूत्रांत द्यावें. (१२) बालकांस टाळू पडते त्यास—हिरडा, वेखंड, कोष्ठ यांचा कल्क करून, त्यांत मध घालून तो अंगावरच्या दुधाशीं पाजावा; म्हणजे तालुकंठनाश होतो. (१४) ओकारीवर वगैरे—हिरड्याचें चूर्ण मधाशीं द्यावें; म्हणजे कफ, रक्तपित्त, शूळ व अतिसार यांचा नाश होतो. (१५) अजीर्णावर—सुरवारी हिरडेदळ व सुंठ हीं समभाग घेऊन चूर्ण करून गुळांत कालवून पाण्याशीं द्यावें. यानें फार दिवसांचें अजीर्ण दूर होतें व क्षुधेची वृद्धि होऊन अन्न पचन होतें. (१६) बद्धकोष्ठास म्हणजे शौचास साफ होत नाहीं त्यास—बाळहिरडे, सोनामुखी, बडीशोप व पादेलोण यांचें चूर्ण ऊन पाण्याशीं द्यावें. (१७) लहान मुलांस रेचक—सुरवारी हिरडा ऊन पाण्यांत उगाळून ३ मासेपासून एक तोळापर्यंत पाण्यांत कालवून पाजावा. (१८) गर्मीचे चट्टे, व्रण इत्यादिकांवर—त्रिफळा (हिरडा, बेहडा व आवळकाठी) लोखंडी कढईत जाळून राख करून ती राख मधांत खलून लावावी म्हणजे व्रण त्वरित भरून येतात. (१९) सर्व प्रमेहांवर—त्रिफळ्याचें चूर्ण हळद व साखर घालून द्यावें. (२०) शनैर्मेहावर—बाळ-

हिरडे, गुलाबकळी देंठ काढून, सोनामुखी यांचें समभाग चूर्ण करून. रात्रीं कोमट पाण्याशीं तीन मासे घ्यावें; म्हणजे प्रातःकाळीं जुलाब होऊन कोठ्यांतील उष्णता वगैरे दूर होतात. ( २१ ) **अंडवृद्धीवर**–बाळहिरड्याचें चूर्ण गोमूत्रांत अथवा एरंडेलांत सकाळीं घ्यावें अथवा त्रिफळा दुधांत द्यावा. ( २२ ) **कासश्वासावर**–हिरडा व बेहडा यांचें चूर्ण मधांत द्यावें. ( २३ ) **शूलावर**—हरीतकीचें चूर्ण, गूळ व तूप यांत द्यावें. ( २४ ) **मेदोरोगावर**–त्रिफळ्याचा काढा मध घालून द्यावा. ( २५ ) **सर्व नेत्ररोगांवर**—त्रिफळ्याचा काढा करून त्यानें नेत्र धुवावे; अथवा त्रिफळ्याचें चूर्ण, रात्रौ मध व तूप यांत द्यावें; किंवा त्रिफळा उगाळून महिन्यांतून चार पांच वेळां अंजन करावें; म्हणजे नेत्रांस विकार कधींही होत नाहीं व दृष्टि निर्मळ राहते. [ २६ ] **पानथरी वगैरेंवर**—बाळहरीतकी व रक्तरोडा [ रोहिडा ] यांचा काढा पिंपळीचें चूर्ण व जवखार किंवा हिंग, बिडलोण व सैंधव मिळवून द्यावा. तेणेंकरून पानाथरी यकृत्, गुल्म, उदर हे दूर होतात. [ २७ ] **वृषणाचे सुजेवर**--त्रिफळ्याचे काढ्यांत गोमूत्र घालून द्यावें. [ २८ ] **भगंदर रोगावर**–त्रिफळा व खैरसाल यांचा काढा, म्हशीचें तूप व वावडिंगाचें चूर्ण घालून द्यावा [ २९ ] **मळशुद्धि होण्यास**—बाळहरीतकी, एरंडेलांत तळून पूड करावी व त्यांत तितकीच पादेलोणाची पूड मिळवून ती ऊन पाण्याशीं द्यावी. [ ३० ] **मुलास आयनेर झाल्यास**--मुरवारी हिरडा व दालचिनी ही थंड पाण्यांत उगाळून, वयाचे मानानें विचारपूर्वक द्यावी. [ ३१ ] **आम्लपित्तावर**—हिरडेदळ व गजपिंपळी हीं समभाग घेऊन बारीक पूड करून जितकीं तीं औषधें घेतलेलीं असतील तितकाच त्यांत गूळ मिश्र करून मोठ्या सुपारीयेवढ्या गोळ्या करून ठेवाव्या, आणि प्रातःकाळीं एक व सायंकाळीं एक, याप्रमाणें गोळी देत जावी. यायोगें अग्नीचें दीपन होऊन कफ व पित्त हे दोन्ही विकार शमन होतात. [ ३२ ] **संधिक सान्निपात**—(सांध्यासांध्यांना सूज व शूळ, शरीराचे ठायीं वायूची पीडा, निरंतर अंग पिळवटल्यासारखें दुखणें, निद्रानाश हीं

लक्षणें होतात.) यावर त्रिफळ्याचा काढा मध घालून द्यावा. (३३) **त्रिफळाचूर्ण, प्रमेहादिकांवर**–हिरडा, बेहडा, आवळकाठी, हीं तीन औषधें समभाग घेऊन चूर्ण करावें. याला त्रिफळा असें म्हणतात. ही त्रिफळा घेतली असतां प्रमेह, सूज, विषमज्वर, कफ, पित्त व कुष्ठ हे दूर होतात; अग्नि प्रदीप्त होतो. ही त्रिफळा रसायनी आहे. तूप व मध यांत त्रिफळा मिळवून घेतली असतां सारे नेत्ररोग साफ दूर होतात. (३४) **घाम न येण्यास**–हरीतकी पाण्यांत वाटून अंगास चोळावी व स्नान करावें; म्हणजे घाम येणार नाहीं. (३५) **सर्व मस्तकशूलांवर**--त्रिफळा किराईत, हळद, कडूनिंब, गुळवेल यांचा काढा करून त्यांत सहा भाग गूळ घालून पिण्यास द्यावा; म्हणजे भृकुटि, आंख, कान या ठिकाणचा शूळ त्वरित बंद होऊन अर्धशिशी, सूर्यावर्त, शंखक, दंतशूल, रातांदळे, नेत्रशूळ यांचाहि अति वेगानें नाश होतो. (३६) **अंतक सन्निपातावर, पथ्यादि काढा**--हिरडा, अडूळसा, फालसा, देवदार, कुटकी, रास्ना, गुळवेल व कोष्ठ यांचा काढा, अंतक ज्वरापासून नराला उपद्रवांसहित मुक्त करितो. (३७) **खोकला येऊन रक्त पडतें व विसर्प, श्वास, वांति यांवर**–हरीतकीचें चूर्ण, तेल, तूप किंवा मध यांशीं द्यावें. (३८) **शीतज्वरावर**–हरीतकी व इंद्रजव यांचें एक तोळा चूर्ण गुळाशीं भक्षण केल्यानें तें तत्काळ शीतज्वराचा नाश करील. (३९) **त्रिदोष, आमातिसार, आनाह, विबंध व विषूचिका यांवर**—हिरडे, सुंठ, नागरमोथे, व गूळ यांचे समभाग औषधाची गोळी द्यावी. (४०) **आमवात, अंत्रवृद्धि व गृध्रसी यांवर**–एरंडेलाशीं हरीतकी भक्षावी. (४१) **सूज, प्रमेह, नाडीव्रण, भगंदर यांवर**–त्रिफळ्याचा काढा म्हशीचें तूप घालून प्यावा. (४२) **अंतर्विद्रधीवर**–हिरडा, सैंधव व धायटीचें फूल यांचें चूर्ण, मध व तूप यांशीं खावें. (४३) **अजीर्ण, गुल्म, वात, उदर, इत्यादि सर्व रोगांवर**--निंबूच्या रसांत सैंधव व पादेलोण घालून त्यांत बाळहिरडे भिजत घालावे व ते सुकल्यावर सेवन करावे. (४४) **फूल, सारा, डोळे येणें, आदिकरून नेत्ररोगांवर**–पुरवारी हिरडा

व खडीसाखर हीं पाण्यांत उगाळून डोळ्यांत घालावीं. (४५) **मुंग्या, माशा आणि वनमाशा यांच्या दंशावर**—वारुळाची माती आणि त्रिफळा यांचा गोमूत्राशीं लेप करावा.

## ४२. हरणखुरी.

हें झाड लहान असतें. फार उंच होत नाहीं. फक्त जमिनीवर पसरलेलें असतें. याचीं पानें कात्रेदार असून बारीक असतात. हीं झाडें हरणांस फार आवडतात, म्हणून या झाडांस "हरणखुरी" असें नांव पडलें आहे. हरणखुरी ही पौष्टिक आहे. (१) **धातुक्षयावर**—हरणखुरीच्या झाडाचें चूर्ण करून तें पावतोळा, पावशेर दूध व दोन तोळे खडीसाखर एकत्र करून रोज सकाळीं घेणें. दिवस ७. (२) **परमा व धातुविकार हीं दूर होऊन पुष्टता येण्यास**—हरणखुरी दुधांत वाटून खडीसाखर घालून १४ दिवस घ्यावी.

## ४३. हरणवेल.

(सं—जीवंती, क्षेमक्षीरी. गु. खरखेडी. का. होणहले. लॅ Dregiavolubilis ड्रेजिआवोल्युबिलिस.)

या वेलाचा पुष्कळ विस्तार होतो. हरणवेलीचीं पानें राताळ्याच्या वेलासारखीं असतात. यास जे कळे येतात, त्यांतून रेशमासारखा पुष्कळ कापूस निघतो. हरणवेलीची भाजी होते. हरणवेलीस हरणदोडी असेंही म्हणतात. **लघु व थोर हरणवेल**—शीतळ, मधुर, स्निग्ध, स्वादु, रसायन, चक्षुष्य, ग्राहक, बलकर, लघु, धातुवर्धक; वृष्य, कफकर, पारदबंधक; व रक्तपित्त, वायु, क्षय, ज्वर, दाह, नेत्ररोग, त्रिदोष, भूतबाधा व पित्त यांचा नाश करिते. हिचें फळ-धातुवर्धक, मधुर व गुरु असें आहे. **सोनहरण वेल**—वृष्य, नेत्रांना हितावह, मधुर, बलकर, शीतल; व वायु, पित्त, दाह व रक्तदोष यांचा नाश करिते. (१) **धातुपुष्टतेस**—हरणवेलीचा पाला वाटून दुधांत द्यावा. (२) **योनिकंदावर**—हरणवेलीची मुळी पाण्यांत वाटून लेप द्यावा.

## ४४. हाडमोडी ( संधिनी. )

हाडमोडी वृक्षावर बांद्याप्रमाणें होते. ही शेराप्रमाणें कांडयुक्त असून हिरवी असते. ही दुरून शेराप्रमाणें दिसते. दोनदोन अंगुळावर हीस चपटे कांड असतात. हिचा पुष्कळ विस्तार होतो. कोंकणांत हिची उत्पत्ति पुष्कळ होते. हीस मिऱ्याएवढीं व रंगानें मोत्यासारखीं गोल फळें येतात. हीं फळें गोड लागतात. मुलें हीं फळें मोठ्या आवडीनें खातात. हीस पानें मुळींच येत नाहींत. धामणीच्या वरील हाडमोडी गुणांनीं जास्त आहे. ( १ ) **अस्थिभंगावर**-हाडमोडी आणून ठेंचून मोडलेल्या हाडावर तीन दिवस बांधावी, म्हणजे अस्थिभंग दूर होतो; अथवा हाडमोडी आणि रक्तरोहि-ड्याची साल ठेंचून हाडावर बांधावी. गुरांसही हाच उपचार करावा व त्यांस चाऱ्यांतून हाडमोडी खावयास द्यावी. ( २ ) **नारूवर**-हाडमोडी बारीक ठेंचून तिचा पेंड बांधावा. ( ३ ) **संधिवातावर**-हाडमोडी, सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, हिरडा, बेहडा, आवळकाठी व दालचिनी यांचा काढा करून घ्यावा. म्हणजे संधिवात त्वरित दूर होतो.

## ४५. हाशा (सं. गोरटक)

हें झाड फार मोठें होत नाहीं. याचीं पानें चार बोटें रुंद असून लांबट असतात. यास बोराएवढीं फळें येतात. या फळास पुष्कळ मुखें असतात. हीं झाडें कोकण व देशावरही पुष्कळ आहेत. याच्या मुळांचा पिंवळा रंग करितात. पिंवळ्या रंगानें वस्त्रें रंगवितात. यास "हशियाहाशि" असेंही म्हणतात; कोणी "बारतोंडी" असें म्हणतात. **हाशा वृक्ष**-तुरट तिखट, रूक्ष, रुचिकर, अग्निदीपक, वस्त्ररंजक, कफघ्न असा आहे. (१) **व्रण पिकण्यास**-हाशियाच्या फळाचा लेप करावा, म्हणजे व्रण पिकून फुटतो. ( २ ) **व्रण पिकविण्यास**--नूतन व्रणाच्या गांठीवर हशियाचा कोंवळा पाला बारीक वाटून अर्धा अंगूल जाडीचा लेप द्यावा, व त्यावर वारंवार ओलें फडकें फिरवीत राहवें; म्हणजे गांठ बसते. ( ३ ) **परम्यावर**—हशियाचें मूळ अगर लांकूड रात्रीं भिजत घालून सकाळीं गाळून त्यांत जिरें व खडीसाखर घालून ७ दिवस प्यावें, म्हणजे परमा जातो.

## ४६. हिंगणी.

(सं. इंगुदी. गु. इंगोरियो. हिं. हिंगोट, हिंगवा. आ. हिलेलजे. बं. हिंगन. इं. Delil डेलील. लॅ. Balanates ब्यालानायटीस.)

दक्षिणेंतील रानांत हिंगणीचीं झाडें जिकडे तिकडे होतात. हें झाड बरेंच उंच वाढतें. या झाडावर कांटे असतात. याच्या फळास हिंगण किंवा हिंगणबेट म्हणतात. हिंगणें कोरून त्यांत दारू भरून तीं उडवितात. दुष्काळांत या फळांतील पांढरा गीर पिठांत मिसळून त्याच्या भाकरी करून गरीब लोक आपला निर्वाह करितात. प्रसंग पडला असतां मनुष्य लांकूड देखील खाऊन आपला बचाव करितो. हिंगणी–मदगंधि, तिखट, लघु, कडू, उष्ण, फेनिल, रसायन; व कृमि, वायु, विष, शूल, श्वित्रकुष्ठ, व्रण, कफ, ग्रहपीडा व भूतबाधा यांचा नाश करिते. याचीं फुलें-मधुर, स्निग्ध, उष्ण, कडु; व वायु, कफ यांचा नाश करितात. (१) नारूवर-- हिंगणीच्या मुळावरची साल व हिंग हीं एकत्र वांटून त्याची पिंडी नारूवर बांधावी व ती चौथे दिवशीं सोडावी; म्हणजे नारू जळून जातो. (२) तारुण्यपीटिकेवर-- हिंगणबेटाचा मगज थंड पाण्यांत उगाळून मुखावर लेप करावा म्हणजे मुरमाच्या पुळ्या जाऊन तोंड निर्मळ होतें. (३) स्तनरोगास–हिंगणीची मुळी उगाळून ऊन करून वर लेप करावा व वरून धोत्र्याचीं पानें लावून बांधावें. दिवस ३. (४) नेत्रस्रावावर--हिंगणीचें फळ पाण्यांत उगाळून अंजन करावें. (५) शूळावर–हिंगणीचें मूळ पाण्यांत उगाळून द्यावें; अथवा फळांतील मगज द्यावा. [६] कर्णमूळावर–हिंगणबेट, हळद, कौंडळ, सैंधव, देवदार, रुईचा चीक यांचा लेप वारंवार करावा, म्हणजे कर्णमूळ बरें होतें. [७] कुत्र्याचे विषावर--प्रथम गूळ खावयास देऊन त्यावर हिंगणीच्या सालीचें चूर्ण नाकांतून प्यावयास द्यावें. [८] मोडशीवर–हिंगणीच्या सालीचें चूर्ण दह्यांतून द्यावें. [९] खोकल्यावर— हिंगणबेटांतील मगजाची गोळी करून खावी.

## ४७. हिरवा चांफा.

( सं.-हरिच्चंपक. गु.-लीलो चंपो. )

हा वृक्ष फार मोठा होत नाहीं. याचीं पानें लांबट व हिरवींगार असतात. या झाडास गळाप्रमाणें आंकडे असतात. कोळी लोक या गळांचा उपयोग करितात. हें झाड रामफळीच्या जातीचें आहे. यास हिरव्या रंगाचें फूल येतें. यास फारच सुगंध येतो. झाड लावल्यापासून २।३ वर्षांनीं यास फुलें येतात कलमापासून व बियापासून याचीं रोपें होतात.

## ४८. हिवर. ( सं. विट्खादिर )

हिवराचें झाड बरेंच मोठें होतें. यास कांटे असतात. खैराच्या झाडाप्रमाणेंच याचीं पानें असतात. याचें लांकूड इमारतीच्या कामीं साधारण उपयोगी पडतें. हिवराच्या झाडाची साल तुरट असते. हिवराच्या सालीचाहि काढा करितात. यास "शेण्या खैर" "गंधी हिवर" असेंही म्हणतात. हिवर हा कडू, उष्ण, तुरट, तिखट, तीक्ष्ण, आंबट, रूक्ष; व कृमि, कफ, मुखरोग, दंतरोग, रक्तदोष, प्रमेह, कंडू, विसर्प, बास्तिरोग, विषमज्वर, पिशाच्चबाधा, उन्माद, कुष्ठ, दाह, व्रण व आध्मान यांचा नाश करितो. याचें फळ-मधुर, स्निग्ध, तिखट, उष्ण आहे; व कफ वायु यांचा नाश करितें. **पोटदुखीवर**—हिवराच्या सालीचा रस द्यावा.

## ४९. हुरा. ( सं. तीक्ष्णदुग्धा. )

हुऱ्याचीं झाडें मोठमोठीं होतात. याचीं पानें कुडयाच्या पानांसारखीं लांबट असतात. या पानांचे देंठ लांबट असून तांबूस असतात. या झाडाचा चीक मोठा तीक्ष्ण आहे. याचें लांकूड पांढऱ्या रंगाचें व नरम असून हीं झाडें कोंकणप्रांतीं पुष्कळ आहेत. हुऱ्याच्या चिकानें डोळ्यांस इजा होते. यावर उतार--दह्याची साय डोळयावर ठेवावी म्हणजे इजा होणार नाहीं. ( १ ) **सर्पदंशावर**—हुऱ्याचा रस पावशेर काढून त्यांत ७ मिरें वाटून द्यावा. किंवा हुऱ्याची साल रिठ्याच्या पाण्यांत उगाळून द्यावी. ( २ ) **घोणसाचे विषावर**—हुऱ्याचा रस द्यावा; किंवा भोंकरीची साल व

फळआंबाड्याची साल समभाग घेऊन पाणी छाटून व बारीक कुटून रस काढावा, व त्या रसांत हुऱ्याची साल उगाळून शक्त्यनुरूप व विषाराचा जोर असेल त्या मानानें दोन किंवा तीन वेळ औषध द्यावें. ( ३ ) **विंचवाच्या दंशावर**–हुऱ्याच्या कांड्याचीं शेवटें तोडून त्या डांसावर चेपाव्या व चीक डांसावर लागूं द्यावा. ( ४ ) **नळास**–हुऱ्याच्या डिऱ्या व वडाच्या पाळ्याचे अंकुर, केळीच्या पानांत बांधून मंदाग्नींत भाजून त्यांचा अंगरस तोंडानें चोखून गिळावा. ( ५ ) **रेचक**–हुऱ्याचा चीक गुंजभर हरभऱ्याच्या पिठांत घालून त्या पिठाची गोळी करून द्यावी. उतार तूरभात. फार रेच होऊं लागल्यास तूप पाजावें. ( ६ ) **रक्तबाऊस**–हुऱ्याचे लांकडाची राख व कळीचा चुना पाण्यांत एकत्र करून वर लावावा व त्यावर गूळ घालून चोळावा; म्हणजे लेरटा बसेल व रक्तबाऊ दूर होईल. ( ७ ) **उंदराच्या विषावर**–हुऱ्याच्या काड्या त्याच्याच चिकांत वाटून डांसावर लेप द्यावा.

## ५० हेद. ( सं. अजकर्ण )

हेदीचे वृक्ष मोठमोठे होतात. कोंकणप्रांतीं हे वृक्ष पुष्कळ आहेत. या झाडाचीं पानें मोठीं असून तीं वाटोळीं व टोंकदार असतात. या झाडाचें लांकूड इमारतीस उपयोगीं पडतें. या लांकडावर लाखी रंग फार सुबक बसतो. या वृक्षास ‘ साहोडा ’ “सांगसांदडा” असेंही म्हणतात. हा एक रंगाचा भेद आहे. याच्या पाल्याच्या रसानें जुलाब होतात. हेदीचें झाड–पित्तकारक, उष्ण, कडू, वातनाशक आहे. ( १ ) **उंदराच्या विषावर**–हेदीच्या अंकुराचा रस ४ पैसेभार व तूप २ पैसेभार एकत्र करून द्यावें. दि० ७. पथ्य कुळितांचें अळणी काट व भात. ( २ ) **गुरांच्या क्षतांतील कृमि मरण्यास**—हेदीच्या तुवऱ्या व पांगाऱ्याच्या तुवऱ्या एकत्र कुटून रस काढावा व तो रस क्षतांत घालावा. व चोथा राहील तो क्षतावर बसवावा. ( ३ ) **डबा, यकृत् व कौलूवर**–गूळ खाण्यास देऊन त्याजवर हेदीच्या पाल्याचा रस द्यावा, व वर पाय करून रहावें. दि० ३. ओषध लागल्यास उतार —नाचण्याची आंबील करून खावी

किंवा तूप द्यावें. (४) नळवायूस व नळगुदावर–हेदीच्या पाल्याचा रस चार पैसेभार घेऊन मिरपूड टाकून द्यावा. ओक लागल्यास सुपारी खावी. उतार तूपभात. (५) कावेळीवर–हेदीच्या टिकशाचा (अंकुराचा) रस गाईच्या दुधांतून शक्त्यनुरूप १ तोळ्यापासून २ तोळे पर्यंत द्यावा. यानें त्वरित गुण येतो. (६) अर्धशिशीवर--हेदीच्या बोरुयांचा रस नाकांत ओढावा. (७) नारूवर--हेदीच्या तुवऱ्या वाटून लावाव्या व तें ३ दिवस सोडूं नये.

### ५१. हेळू.

हें एक रानझाड आहे. तें सुमारें २५ हात उंच असून, त्याचा विस्तार आठ दहा हात असतो. याचीं पानें कुडयाच्या पानांपेक्षां लहान असतात. देशांत यांस अळू असें म्हणतात. यास सुमारें पेरूएवढीं फळें येतात. या फळांस आळवें म्हणतात. याची भाजी करितात. ही भाजी कांहींशी हिरव्या केळ्यांसारखी लागते. या फळांचा हंगाम ज्येष्ठअखेरपर्यंत असतो. गरीब लोक एकदोन दिवस या भाजीवरच काढतात. (१) वळ, बद पिकण्यास—हेळूच्या झाडाचीं ओलीं पानें आणून, थोड्या पाण्यांत वाफ येईपर्यंत शिजवावीं. नंतर तीं पानें बारीक वाटून त्याची चापटळी करून बदावर बसवून तीवर दोन दोन थेंब पाणी सोडीत रहावें. (५) मुलांचे माकडखोकल्यावर–हेळूचीं पक्क फळें खाण्यास द्यावीं. (३) मोडशीवर—अळूंतील बीं मधांत उगाळून द्यावी; अथवा हेळूचें मूळ पाण्यांत उगाळून द्यावें; (४) दमा, खोकला यांवर -हेळूचा पाला चिलमींत घालून ओढावा. (५) डोळ्यांतील फुलें, भूर वगैरे नेत्ररोगांवर–अळूंतील बीं उगाळून अंजन करावें.

---

सहावा भाग समाप्त.

5075

১০৭১
শাস্ত্র ০৩৩৭